# शिवराज

## १९७५-७६



कर्मवीर वि. रा. शिंदे शिक्षण संस्था, गडहिंग्लज

# शिवराज कॉलेज

# शिवराज वार्षिक

प्रकाशन दि. २० एप्रिल, १९७६.

## संपादक मंडळ

अध्यक्ष :

**प्राचार्य बलवंत देशमुख**

कार्यकारी संपादक :

**डॉ. सुधाकर गोकाककर**

विभागीय संपादक :

**प्रा. विठ्ठल बन्ने, प्रा. नामदेव दुंडगेकर,**
**प्रा. सौ. मधुमालती कोटीभास्कर.**

विद्यार्थी प्रतिनिधी :

**श्री. शिवाजी कुराडे**
**श्री. शेलाजी केसरकर**

मुद्रक :
अलंकार प्रिंटर्स, गडहिंग्लज.

ब्लॉक मेकर्स :
लक्ष्मी प्रोसेस, कोल्हापूर.

Statement about ownership and other particulars about newspaper 'Shivraj' Miscellany of Shivraj College, Gadhinglaj to be published in the first issue every year after last day of February.

## From No. IV ( Rule No. 3 )

| | |
|---|---|
| Place of publication | : Shivraj College, Gadhinglaj. |
| Periodicity of Publication | : Annual, |
| Printer's Name | : Alankar Printers, Gadhinglaj. |
| Nationality | : Indian. |
| Address | : Alankar Printers. Gadhinglaj. |
| Publisher's Name | : Prin. B. B Deshmukh. |
| Nationality | : Indian. |
| Editor's Name | : Dr. S. G. Gokakakar, |
| Nationality | : Indian. |
| Address | : Shivraj College, Gadhinglaj. |

I Prin. B. B Deshmukh hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

**B. B. Deshmukh,**
Signature of Publisher

# संपादकीय –

स्वप्न आणि सत्य यामध्ये जमीन आसमानचे अंतर असते असे म्हणतात. पण म्हणून कुणी स्वप्ने पाहण्याचे आणि ती प्रत्यक्षात आणावयाचे कधी सोडले आहे काय ? स्वप्नें पाहणे म्हणजे भविष्याच्या चांगुलपणाची, माणसाच्या जिवंतपणाची ती साक्ष होय. युवकमन जर स्वप्ने रंगविण्याचे सोडून देईल तर भविष्य म्हणजे काळाकुट्ट अंधारच उरेल. सुंदर आणि कोमल जरतारीने विणलेली स्वप्नें, हळुवार मनाचे आविष्कार, अधिकाधिक विस्तृत होत जाणाऱ्या क्षितीजाची डोळस जाण आणि मानवाविषयीचा विशाल दृष्टीकोण या विविध रंगाच्या आडव्या उभ्या धाग्यांनी जीवनाचे वस्त्र रुप घेत असते, रंग फाकवीत असते, रसाची पखरण करीत असते, जीवनाला गंधित करीत असते. युवामनाचे असे विविधांगी भाव-विचार पुढील पानातून आपणास पाहावयास मिळतील.

युवकांच्या स्वप्नांप्रमाणेच संस्थेचे, समाजाचे पण एक स्वप्न साकारत आहे. शंकराच्या प्राप्तीसाटी म्हणे उमेने अपार तप केले तेव्हा तो भोळा सांब प्रसन्न झाला. नवाकांक्षांच्या स्वप्नांना आकार देणाऱ्या या संस्थेंने देखील एक 'तप' त्या शंकरांची आराधना केली. या महाविद्यालयात पाऊल टाकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनांत, नेत्रांत उद्याच्या स्वतःच्या वास्तूचे स्वप्न तरंगले नसेल तरच नवल. पण 'शंकर' असा सहजासहजी कसा प्रसन्न होईल ? त्यासाठी एक तप आचरावे लागले, एक तप घालवावे लागले. आणि आज ही वास्तू आकार घेत आहे. या वर्षीचा विद्यार्थी किमान आपल्या चिंतनासाठीं नव्या वास्तूत प्रवेशला आहे मानवाचा 'तिसरा डोळा'–ग्रंथ म्हणतात–नव्या वास्तूत उघडला आहे.

तपःपूर्तीची फळें आता मिळू लागली आहेत. के. एस. मोहिते या विद्यार्थ्याने अखिल भारतीय विद्यापीठीय अॅथलेटिक्स स्पर्धात ५००० मी. धावण्याच्या शर्यतीत ब्रॉझ पदक मिळवून या कॉलेजला अखिल भारतीय स्तरावर नेऊन पोचविले आहे तर आमच्या प्राचार्यांनी ज्ञानाच्या क्षेत्रात शिवाजी विद्यापीठाचे बक्षिस पटकावून विद्यापीठीय स्तरावर महाविद्यालयाचे नाव रोशन केले आहे. अभिनंदन ! अभिनंदन !!

या वार्षिकाला आकार देण्यासाठी विद्यार्थी-विद्यार्थिनी, मुद्रक, ब्लॉक मेकर्स, तसेच माझे अन्य सहकारी यांचे प्रत्यक्ष श्रम, अनेकांच्या प्रेरणा आणि मार्गदर्शन, वार्षिकाच्या विद्यार्थी-प्रतिनिधींचा लकडा या सर्वांचे सहकार्य कारणीभूत झाले आहे. सर्व ज्ञाताज्ञातांचे आभार.

**--संपादक**

# • आमचे विद्यार्थी मंडळ •

**अध्यक्ष : प्राचार्य बलवन्त देशमुख**

**उपाध्यक्ष : प्रा. के. बी. केसरकर**

जनरल सेक्रेटरी : श्री. तानाजी व्ही. पेडणेकर

| | |
|---|---|
| १) ॲथलेटिक्स– | १) कुराडे एस. के.<br>२) मोहिते बी. के.<br>३) ए के बळ्ळोळी |
| २) वादविवाद– | कुराडे एस व्ही. |
| ३) सहल– | रणनवरे पी. जे. |
| ४) भारतीय खेळ– | जाधव एस के. |
| ५) विविध करमणुक व राष्ट्रीय उत्सव | १) शिंदे सी. जी.<br>२) पाटील ए. आर.<br>३) रणनवरे पी. जे.<br>४) कु. जोशी पी. एन. |
| ६) भित्तीपत्रक– | १) बळ्ळोळी ए. के.<br>२) कु. बेकनाळकर आर. बी.<br>३) कु. जोशी पी. एन. |
| ७) मायनर गेम्स– | देवार्डे एस. बी. |
| ८) मॅगझीन– | १) कुराडे एस. व्ही.<br>२) केसरकर एस. बी. |
| ९) क्रिकेट– | देवार्डे एस बी. |
| १०) लघुउद्योग– | १) चव्हाण पी. बी.<br>२) पेडणेकर टी व्ही. |
| ११) खेडे दत्तक योजना– | १) पाटील एस. डी.<br>२) मोहिते बी. के. |
| १२) अभ्यासमंडळ– | केसरकर एस. बी. |
| १३) महिला कल्याण मंडळ– | १) कु. बेकनाळकर आर. बी.<br>२) कु. जोशी पी. एन. |

यः क्रियावान स पण्डितः ।



कर्मवीर वि. रा. शिंदे

# गव्हर्निंग कौन्सिल



सेक्रेटरी मा. प्रा. देशमुख



उपा. डॉ. सावंत



उपा. मा. कदमसाहेब



अध्यक्ष मा. बाळासाहेब माने



मा. मोहिते



मा. फडणीस



मा. देसाई



मा. पताडे



मा. अॅड. शिंदे



प्रा. दुंडगेकर



माननीय देसाई



मा. मोहिते



प्रा जाधव

कुलगुरु



माननीय पी. जी. पाटील

चेअरमन



माननीय बाळासाहेब माने



प्राचार्य । माननीय बी. बी. देशमुख

# मराठी विभाग

देता येईल तितकं
देत राहीन
देण्यासारखं काहीच उरणार नाही
तेव्हा
द्यायची ताकदच
देईन तुला.

**– अनाम**

# गव्हर्निंग कौन्सिल

| | | |
|---|---|---|
| १) | मा बाळासाहेब तथा रा. शं. माने | अध्यक्ष |
| २) | ,, डॉ. जी. पीं. सावंत | उपाध्यक्ष |
| ३) | ,, धोंडीराम सं. कदम | ,, |
| ४) | ,, प्राचार्य बी. बी. देशमुख | सेक्रेटरी |
| ५) | ,, नागाप्पाण्णा गु. बटकडली | सदस्य |
| ६) | ,, यशवंत रा. मोहिते | ,, |
| ७) | ,, धोंडीराम पताडे | ,, |
| ८) | ,, गणपतराव बा. देसाई | ,, |
| ९) | ,, शंकरराव बा. चव्हाण | ,, |
| १०) | ,, शंकरराव तु. देसाई | ,, |
| ११) | ,, श्रीपतराव दि. शिंदे | ,, |
| १२) | ,, व्ही. व्ही. फडणीस | ,, |
| १३) | ,, प्रा. एन्. आर्. दुंडगेकर | ,, |
| १४) | ,, बी. एस्. मोहिते | ,, |

# २० कलमी आर्थिक कार्यक्रम

**एन. बी. पाटील**
तृतीय वर्ष साहित्य

आज आपल्या देशात अनुशासन पर्व सुरू झाले आहे. कायद्याची योग्य प्रकारे अंमलबजावणी होणे व जनतेने शिस्तबद्धरतीने कायदा पाळणे हा अनुशासनाचा भाग आहे. प्रत्येकाने आपले काम नियमितपणे, वेळच्यावेळी आणि मनापासून करणे याचाच अर्थ अनुशासन असे मी मानतो आणि ह्याचसाठी प्रत्येकाने स्वतःहून काही बंधने, शिस्त अंगी बाणून घेणे अगत्याचे आहे.

अनुशासन पर्वात भविष्य काळाला आकार देण्यासाठी आपल्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी जो २० कलमी कार्यक्रम जाहीर केला आहे; आपण सर्वांनीच त्यासाठी स्वयंशिस्तीने मनःपूर्वक कार्यरत झाले पाहिजे.

२६ जून रोजी देशात आणीबाणी राष्ट्रपतींनी जाहीर केली. आणि १ जुलै रोजी पंतप्रधान श्रीमती गांधी यांनी जनतेच्या अडचणी निवारण करण्याच्या दृष्टीने एक तातडीचा २० कलमी कार्यक्रम जाहीर केला. या कार्यक्रमामुळे देशामध्ये एकूण आर्थिक दृष्टिकोणात बदल घडून येईल असेही त्यांनी सांगितले. आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ही एक प्रकारची संधी आहे असेही त्या म्हणाल्या.

महाराष्ट्र शासनाने आणीबाणी जाहीरनाम्याचे प्रथम स्वागत केले. एवढेच नव्हे तर या संधीचा आर्थिक विकासासाठी पुरेपूर उपयोग करून घेण्याचा निर्धार केला आहे. तसेच महाराष्ट्रामध्ये २१ फेब्रुवारी १९७५ रोजी मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती येताच ना. शंकररावजी चव्हाण यांनी आकाशवाणीवरून जे धोरण विषयक निवेदन केले होते त्यात नव्या वाटचालीच्या दिशा स्पष्ट झाल्या आहेतच. इतकेच नव्हे, पंतप्रधानांनी जाहीर केलेल्या २० कलमी कार्यक्रमातील काही कलमांची कार्यवाही अगोदरच ह्या राज्यात सुरू झाली होती. बेघरांना घरे बांधून देणे, धान्यउत्पादनांत वाढ करणे, वीजनिर्मितीत वाढ करणे या गोष्टींचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. आणीबाणीच्या धोरणामुळे जनतेस जबाबदारीची, शिस्तीची, राष्ट्रीय कर्तव्याची नवी जाण निर्माण झाली आहे. व्यापारी व उद्योगपती ही कायद्याचा पाळने ओळखतील अशी चिन्हे दिसतात. गोंधळ, अस्थिरता, निराशेच्या भावना नष्ट होऊन काळबदलाचा एक प्रकारचा आत्मविश्वास दिसत आहे.

'आणीबाणी ही आपत्ती असली तरी आजच्या परिस्थितीत ही इष्टापत्ती आहे. देश समृद्धीच्या दिशेने पुढे नेण्यासाठी ही आणीबाणी म्हणजे आपल्याला नामी संधी चालून आलेली आहे असे मानले पाहिजे." जवळ जवळ २९ वर्षे झाली, १९४७

पासून जवळ जवळ ही भारताची स्वातंत्र्य रूपी ज्योत पेटत आहे. आजतागायत या ज्योतीमध्ये तेल, घालण्याचे तेवढे काम केले. मात्र त्या ज्योतीमधील वातीभोवती जी काजळी जमा झाली आहे तिच्यामुळे प्रकाश कमी पडतो आहे, हे मात्र कोणाच्या लक्षात आले नाही. पंतप्रधान इंदिराजी दूरदृष्टीच्या असल्यामुळे त्यांनी पणतीच्या वातीवरील काजळी काढण्यासाठी जनतेला सांगितले. कारण हे एकट्याचे काम नसून जनतेचे आहे. तेव्हा सर्वांनी मिळून स्वातंत्र्य रुजविले, न विझेल अशा प्रकारे काळजी घेतली व त्या ज्योतीवरील काजळी काढली म्हणजे सपूर्ण भारत जगाच्या व्यासपीठावर झळाकून दिसल्याविना राहाणार नाही.

ज्याप्रमाणे इंदिराजींनी २६ जुलै १९७५ रोजी आणीबाणी जाहीर केली अगदी त्याचप्रमाणे रशियामध्ये लेनिनने The New Economic policy 1921–28 जाहीर केली व त्यांनी यसस्वी रित्या पार करून दाखविली. त्याचप्रमाणे इंदिराजींनी २० कलमी आर्थिक कार्यक्रम पुढीलप्रमाणे जाहीर केला.—

१) जीवनावश्यक वस्तूंच्या किमती कमी करण्याच्या दृष्टीने सतत उपाय योजणे. या वस्तुंचे उत्पादन वसूली व वितरण सुविहित करणे–खात्याचे मंत्री व राज्य मंत्र्यांनी उत्पादक, घाऊक व किरकोळ व्यापारी यांच्या अनेक बैठका घेऊन वस्तूंच्या किमती कमी करण्याची गरज व निकड पटवून दिली. उदा:– पाव, मटण, फरसाण, साबण, अन्नधान्य, डाळी, साखर खाण्याचे तेलयुक्त वनस्पती तूप, जळावू लाकूड, चहा व कॉफी. तसेच हॉटेल मालकांनी पण खाद्यपदार्थांच्या किमती कमी केल्या आहेत. अन्नधान्य वाढविण्यासाठी संकरीत व उन्नत जातींच्या लागवडीचे उद्दिष्ट गाठणे. तसेच रोगाचा वेळ च बंदोबस्त करणे. महाराष्ट्र सरकारने नवीन पद्धतीने लेव्ही स्वीकारण्याचे तत्व अंगिकारले आहे गेल्या वर्षी १९७४–७५ मध्ये २७ लाख टन धान्य वसूली झाली. यंदा ५५ लाख टनपर्यंत जाईल. १५ रु शेतसारा भरणाऱ्याकडून लेव्ही घेतली जाईल. तसेच सिमेंट वाटपावर पण सरकारचे नियंत्रण असून साठ्यापैकी ६५% गावीत वाटपासाठी ठेवले आहे व ३५% साठा सिमेंट कंपन्यांच्या अधिकृत परवानाधारक विक्रेत्यांकडे जनतेच्या वितरणासाठा ठेवलेला आहे.

२) कमाल धारणा क्षेत्र कायद्याची अंमलबजावणी करणे, जास्तीच्या जमिनीचे त्वरित वाटप करणे. हक्क नोंदणीचे दप्तर तयार करणे–कमाल धारण क्षेत्राचा कायदा १९६२ पासून अंमलात आहे तसेच १९७२ च्या ऑगस्टमध्ये विधेयक मंजूर केले या विधेकात धारणा क्षेमाची मर्यादा ७२ हेक्टर (१८ एकर) पासून १४.४ हेक्टर (३६ एकर) जिरायीत जमिनींच्या बाबतीत जास्तीत जास्त २१६ हेक्टर (५४ एकर) होती.

## भूमिहीनाना जमीन :

१९६० सालापासूनच भूमिहीनांना जमीनी देण्याची उपाय योजना केला होती. १ म १९६० जानेवारी पर्यंत राज्यात एकूण ४३,८,६८९ हेक्टर जमीन वाटण्यात आली आहे. ७३% जमीन मागास वर्गास वाटली आहे याशिवाय कृषि महामंडळाकडे असलेल्या जमीनी पुन्हा मूळच्या खंडकऱ्यांना देण्याचाही शासनाने निर्णय घतला. खडकऱ्यांनी सदर जमीनी आपल्याला परत मिळाव्यात अशी मागणी केली या मागणीवरून ज्याचे वार्षिक उत्पन्न ४.००० रुपयापेक्षा जास्त नसेल त्यांना जमीनी परत देण्याचे शासनाने ठरवले. त्याचप्रमाणे १,६२१ खंडकऱ्यांना २,१६७ हेक्टर जमीन परत दिली.

## हक्क नोंदणी :

जिल्हाधिकाऱ्यांनी कोणत्याही परीस्थितीत हे काम ३० नोव्हेंबर १९७५ पर्यंत पूर्ण केले पाहिजे असा आदेश दिला. तसेच तालुका सूत्रीकरण व आढावा समित्यांनीही हक्क नोंदणीची दप्तरे अद्यावत ठेवली जातात की नाही या कामाकडे लक्ष द्यावे असाही शासनाने आदेश दिला.

३) आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांच्या व भूमिहीनांच्या निवासासाठी तरतूद करणे: हे सूत्र २१ फेब्रुवारीरोजी शंकरराव चव्हाण यांनी आकाशवाणीवरून केलेल्या धोरण–विषयक निवेदनात दिले होते. १९७५ डिसेंबर अखेर गृहहीनांना घरे देण्याचे काम पूर्ण करण्याचे ठरले. जून १९७५ अखेर २.६८ लाख गृहहीनांना जागा दिल्या व उरलेल्या १.३७ लाख खाजगी मालकीच्या जमीनी देण्यात येतील. प्रत्येक कुटुंबाला ८३ चौ. मी. जागा मोफत देण्यात येईल. जून १९७५ ते मार्च १९७६ पर्यंत १ लाख घरे बांधण्याचा शासनाने संकल्प केला आहे. प्रत्येक घर बांधणें साठी ९०० रु. खर्च येईल. भिंतीसाठी कच्च्या विटा घालण्यासाठी जिल्हा बेकारी रोजगार हमी योजनेखाली प्रत्येकी ८० रु. खर्च करू शकतात. तसेच साखरकारखान्यांनीही या कार्यातील पात्र भूमिहीन मंजुरांसाठी सुमारे ४२,००० घरे त्यांच्या खर्चाने बांधून देण्याची जबाबदारी स्वीकारली आहे.

**४) वेठबिगारीला बंदी–** महाराष्ट्र राज्यामध्ये सहसा वेठबेगार पद्धती आढळून येत नाही. तरी त्यातूनही अशी पद्धत आढळून आल्यास त्याबाबतीत शासनाने ताबडतोब इलाज करण्याचे ठरविले. वेठबिगार म्हणजे वर्षानुवर्षे शेतमालकाच्या घरी काम करणे त्यांना कसल्याही प्रकारचे स्वास्थ नाही, विश्रांती नाही, मरेपर्यंत काम करणे. त्यासाठी उपाय योजना म्हणून आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक पिळवणुक थांबावी. त्यांना आपले आर्थिक व्यवहार स्वतःच पाहाता यावेत असा ह्या उपाय योजनेचा हेतू आहे.

५) ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणा नष्ट करणे, भूमिहीन शेतमजूर, अल्पभूधारक आणि कारागीर यांच्या कर्जवसूलीच्या मुदत वाढीला कायदेशीर स्वरूप देणे – गरीब शेतकऱ्यांची खाजगी सावकाराकडून होणारी पिळवणूक थांबणेसाठी राज्यात काही कायदे अंमलात आले. सावकारी नियंत्रण कायदा; शेतकरी कर्जनिवारण कायदा या कायद्यामुळे अल्पभूधारकांचा फायदा झाला आहे. भूमिहीन मजूराची वा कामगाराची जमीन २ हेक्टरपेक्षा कमी असेल तर कर्ज वसुलीत मुदत वाढवून देण्यात आली. काही बाबतीत काहींची कर्जमुक्ती पण झाली. तसेच खाजगी सावकारांच्याकडे गहाण वस्तू ठेवल्या असतील तर त्या ताबडतोब पैसे न भरता परत मिळाल्या. त्यामुळे कामगार व शेतकरी ४०% कर्जमुक्तीतून दूर झालेले दिसते.

६) शेतमजुराच्या किमान वेतनाच्या कायद्याची फेरतपासणी करणे:–शेतकऱ्यांना सामाजिक व आर्थिक न्याय मिळवून देण्याचे शासनाने ठरविले आहे. तसेच अलिकडे शेतकऱ्यांचे किमान वेतनाचे दर पण ठरवून दिले आहेत. त्यात त्यांनी ३ विभाग पाडले असून पहिल्या विभागात मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर व सोलापूर ही महानगरपालिकेच्या कक्षेत येणारी क्षेत्रे. पुणे व खडकी कन्टोन्मेंट यांचा समावेश होतो. मात्र यातील ग्रामीण भागातील आंतरभाग येत नाही. यासाठी ठरलेला किमान वेतन दर ४·५० रुपये. दुसरा विभाग अ आणि ब नगरपालिका क्षेत्र. यात देहू, अहमदानगर, औरंगाबाद, नाशिक रोड, यांच्यासाठी किमान दर ३·७५ रुपये. तिसरा भाग नगरपालिकेची क्षेत्रे व उरलेला ग्रामीण विभाग ३ रुपये, असे शासनाने दर ठरवले. या जर दरामध्ये बदल झाला तर किंवा मजुरी कमी मिळाली तर या कायद्याखाली प्रस्थापित केलेल्या प्रतिनिधीकडे अर्ज करता येतो व योग्य तो न्याय मिळवता येतो.

७) ५० लाख हेक्टर जमीन पाण्याखाली आणणे आणि भूगर्भातील पाण्याचा उपयोग करण्याचा राष्ट्रीय कार्यक्रम तयार करणे –सिंचनक्षमतेत वाढ करण्याच्या दृष्टीने १९७६ च्या जूनपर्यंत प्रवाही दृष्टीने उपसिंचन मार्गाने १.२७ लाख हेक्टर जमीनीला सिंचनक्षमता वाढवणेचा इष्टांक पुढे ठेवला. १९७५–७६ सालात आणखीन ९.२७ कोटी रु. उपलब्ध झाले तर ३२,५०० हेक्टर व जून १९७७ मध्ये ३७,००० हे. सिंचनक्षमता वाढू शकेल. (अ) जूनमध्ये ४३ छोट्या योजना पुऱ्या करून १९,५०० हे. सिंचनक्षमतेसाठी २३० लाख रु. जादा खर्च येईल. (ब) १० मध्यम प्रकल्पांवर जादा २७० लाख रुपये खर्च करून ५,५०० हेक्टर जादा सिंचनक्षमता निर्माण करणे. (क) मोठ्याप्रकल्पावर

४७० लाख रु. खर्च करुन १९७५ पर्यंत ७५०० हे. आणि जूनपर्यंत १९७६ पर्यंत १७,००० हे.

८) वीज निर्मितीच्या कार्यक्रमास गती देणे:– येत्या ३–४ वर्षात ८०० मेगॅवॅट विजेचा तुटवडा पडेल असे शासनाला वाटले त्यामुळे वीज निर्मितीस गती देण्यासाठी केंद्राकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या योजनांमध्ये पुढील योजनांचा समावेश होतो : चंद्रपूर प्रकल्प (१३०० मे वॅ.), खापरखेडा विस्तार (१२० मे. वॅ.) परळी विस्तार (१२० मे. वॅ.) उमरेड (४०० मे वॅ ) म्हादाशेवा (२००० मे. वॅ.)तुर्भे, टाटा (५०० मे. वॅ.) असे एकूण ४,४४० मे. वॅ.) राज्याची वीजनिर्मिती क्षमता १६९८ मे वॅट इतकी असून व्यापित शक्ती २२१६ मे. वॅट आहे. जून १९७६ पर्यंत कोराडी येथे २४० मे वॅट, कोयना तिसरा टप्पा २४० मे वॅट आणि वैतरणा ६० मे वॅट अशी एकूण ५४० मे वॅट अशी जादा निर्माण होवू शकेल.

९) हातमाग क्षेत्राचा विकास करण्यासाठी नवी योजना :– १·८५ लक्ष हातमागापैकी ५०% हातमाग सहकारी पद्धतीने कापड निर्माण करतात. हातमागावर तयार झालेल्या कापडावर रिबेट देण्याची योजना यापुढे चालू ठेवण्यात येणार असून त्यासाठी पाच वर्षाच्या काळात ३७५ लक्ष रुपये खर्च करण्यात येईल.

१०) जनता कापडाच्या दर्जात व पुरवठ्यात सुधारणा करणे:—कापड उत्पादकांचा या बाबतात छोटी उपसमिती नेमण्यात आली. नियंत्रित दराने विकल्या जाणाऱ्या कापडाचा दर्जा चांगला ठेवण्याबाबत तसेच कापड गिरण्यांची योग्य प्रकारे प्रमाणित कापड निर्मिती तयार करावे याबाबत ही उपसमिती अभ्यास करीत आहे.

११) शहरातील रिकाम्या जागांचे सामाजिकीकरण करणे, मोकळ्या जागा जागेची मालकी यांवर मर्यादा घालणे:— मुंबई, पुणेसारख्या वाढत्या वस्तीच्या शहरातून निवासी जागांचा प्रश्न दिवसे दिवस तीव्र होत आहे. मोकळ्या जमीनीत पैसा गुंतवून नंतर नफा मिळवण्यासाठी जमीनी विकत घेतल्या जातात. दुसरीकडे सामान्य लोकांना राहाण्यासाठी जागा मिळत नाही. १९६७ ला रिकाम्या जागा ताब्यात घेण्याचा कायदा केला होता, पण तो रद्द करून पुन्हा निर्णय घेतला तो मुंबई महानगरपालिकेला लागू असून ३१ डिसेंबर १९६५ नंतर रिकाम्या झालेला जाग्याबाबतची माहिती घर-मालकांनी शासनाला कळवली पाहिजे. देशातील राहण्याच्या बाबतीत पण जी विषमता आहे ती दूर करण्यासाठी ह्या कलमाचा पुरेपूर उपयोग केला जात आहे.

१२) बेकायदेशीर बांधकामाची किंमत ठरविणे व कर चुकवणाऱ्यांसाठी खास पथके निर्माण करून आर्थिक स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्यांवर त्वरित खटले भरून त्यांना कडक शासन करणे:– बांधकामाच्या बाबतीमध्ये अतोनात पैसा खर्च केला जातो. प्रत्यक्ष बंगला ५० हजारचा दाखवतात मात्र तो आतून पाहिला तर नंदनवनच असते. त्याच्या आतील नक्षीकाम फर्निचर याचीच किंमत जवळजवळ ८–१० लाख असते असा पैसा लपविला जातो. तसेच यामुळे सरकारला योग्य फायदा पण मिळत नाही. तसेच विक्रीकर पण चुकवले जातात. मुंबईमध्ये एका महिन्यात २४० दुकानांवर छापे घातले तेव्हा १३ कोटी रु. मालावरील विक्री कर चुकवलेले आढळून आले. याच्यावर इलाज केला जात आहे.

१३) तस्करांची मालमत्ता जप्त करण्याच्या दृष्टीने खास कायदे करणे:-चोरट्या आयात चा धंदा करणाऱ्यांना अटक करणे फरारी इसमांविरुद्ध कारवाई करणे स्मगलर लोकांना योग्य ती शिक्षा देणे हद्दपार करणे इत्यादी अनेक उपाय करण्यात आले आहेत. चोरट्या मालामुळे, धंद्यामुळे अर्थव्यवस्था बिघडली यासाठी या कलमाचा उपयोग केला आहे. तसेच लाचलुचपत देण्याऱ्यांना पकडणे. तसेच २०८ तस्करांना हद्दपार केले असून २१ फरारी आहेत. ठाणे, कुलाबा, रत्नागिरी येथे खास पथके नेमून खास समुद्र काठावर देखरेख ठेवण्यात आली आहे.

१४) परवान्याची कार्यपद्धती सुलभ करणे, आयात परवान्याच्या गैरवापरास आळा घालणे:-नवीन भांडवलाची गुंतवणुक करण्याच्या बाबतीत परवानगीची अवघड कार्यपद्धती अडचणीची होत असल्यामुळे ती सुलभ करण्यात आली आहे. तसेच प्रवास आयात परवान्यास आळा घालण्यासाठी आयात-निर्यात विषयक धोरणात केंद्र सरकार प्रयत्न करीत आहे.

१५) उद्योगधंद्याच्या कामगारांना सहभाग देण्याची योजना:-कामगारांना सहभागी करून घेतल्यानंतर आपोआपच त्यांची कार्यक्षमता वाढते. ते आपलेच काम म्हणून काम भरपूर करतात त्यामुळे देशाचे आपोआपच हित होते व श्रीमंत गरीब हा भेदभाव नाहीसा होतो.

१६) रस्ते वाहतुकीसाठी राष्ट्रीय परवानगी:— प्रत्येक राज्यामधून वाहतूक व्यवस्थित पणे व्हावी त्यांना कोणत्याही प्रकारचे अडथळे येऊ नयेत त्यासाठी प्रत्येक राज्याने खास प्रयत्न करून वाहतुकीतील अडथळे दूर केले आहेत व राष्ट्रीय परवाने त्याना दिल्यामुळे देशात ते सुलभरीत्या वाहतूक करू शकतील, हे आंतर राष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने महत्त्वाचे कलम आहे.

१७) आयकराची किमान मर्यादा ८,००० रु. पर्यंत वाढविणे:—काही मध्यमवर्गीय लोकांना गेल्या काही काळात ठराविक वेतन असल्यामुळे हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या तेव्हा त्यांना दिलासा, देण्यासाठी आयकराची किमान मर्यादा ६,००० वरून ८००० रुपये करण्याचे केंद्र शासनाने ठरविले आहे.

१८) वसतिगृहातील विद्यार्थ्यांना वस्तू नियंत्रित दरात उपलब्ध करून देणे:-विद्यार्थीना लागणारा स्टेशनरी माल तसेच आवश्यक वस्तू रेशनकार्डावर उपलब्ध करून सरकारी नियंत्रण दराखाली देणे, जादा वस्तू आणल्या गेल्या तर शिधा-पत्रिकेवर उपलब्ध करून दिल्या जातील.

१९) पाठ्यपुस्तके नियंत्रित दरात उपलब्ध करून देणे व पुस्तक पेढ्या उपलब्ध करणे:-विद्यार्थ्यांसाठी स्वस्त दरात पुस्तके उपलब्ध करून देणे. ती पुस्तके विद्यार्थीपर्यंत ताबडतोब पोचावीत या दृष्टीने पुस्तक पेढ्या स्थापन कराव्यात तसेच वह्यापण सरकारी दरात द्याव्यात व विद्यार्थीना लौकर पोच होतील याची व्यवस्था करणे.

२०) आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी प्रशिक्षणाची आणि नोकऱ्यांची अधिक प्रमाणात उपलब्धता व्हावी यासाठी नवी "शिकावू उमेदवार" योजना तयार करणे

आर्थिक दृष्टया जे लोक दुर्बल आहेत त्यांना शिक्षण घेणे अतिशय कठीण होऊन बसले आहे. त्यामुळे त्यांना थोडी आर्थिक मदत करून तांत्रिक ज्ञान देणे. भारतामध्ये तांत्रिक ज्ञान हे ठराविकच लोकांना मिळते म्हणजे ज्यांची शहरात जाऊन राहण्याची ऐपत आहे अशांना फक्त उपभोग घेता येतो. प्रशिक्षणाची सुरवात महाराष्ट्रामध्ये ६१ उद्योग धंद्यांत चालू असल्याची दिसून येते. केंद्र सरकारच्या आदेशाप्रमाणे अनुसूचित जाती-जमाती यांच्यासाठी राखीव काही जागा ठेवलेल्या आहेत.

तसेच ज्या कुटुंबात मासिक उत्पन्न २००/- रुपयापेक्षां कमी असेल अशा कुटुंबातील व्यक्तीस नोकऱ्यांच्या बाबतीत ३०% जागा राखीव ठवण्याचा केंद्र सरकारने निर्णय घेतला आहे

तसेच सुशिक्षित बेकारांच्यासाठी:-सुशिक्षितांच्या बेकारीला आळा घालण्यासाठी यावर्षी "एम्प्लॉयमेंट प्रमोशन" हा कार्यक्रम राज्य शासनाने हाती घेतला आहे. निरनिराळ्या घटक उद्योगधंद्याच्या साहाय्याने सुशिक्षितांना ६ महिने प्रशिक्षण देऊन त्यांना स्वयंउद्योगी बनविणे हा या योजनेचा हेतू आहे. एकूण १२,००० सुशिक्षित बेकारांना प्रशिक्षण देण्याचा इष्टांक ठरविला आहे. त्यापैकी २,००० लोक अनुसूचित जाती व अनुसूचित जातिजमातीचे असतील. प्रशिक्षणाच्या काळात १०० रु. पासून

४०० रु. पर्यंत विद्यावेतन देण्यात येईल त्याचप्रमाणे मागासवर्गियांसाठी ठेवलेल्या राखीव जागेसाठी त्याचे प्रशिक्षण पूर्ण झालेनंतर तेथेच भुरवण्यात येईल.

तसेच सरकारी कामामध्ये काटकसर करणे व व रोजगार हमी योजनेखाली अनेक योजना राबवणे व व त्या यशस्वी करून वाढवणे हे या २० कलमी कार्यक्रमाचे म्हणजे इंदिराजींचे मुख्य कार्य होय.

—▭○▭—

## ❊ वेचलेले मोती ❊

❊ लग्नाप्रमाणे आत्महत्येला गोरज मुहूर्त चांगला.

卐 नियती मोठी क्रूर वाघीण ! माणसाच्या दुःखाची चटक तिला नेहमीच लागलेली असते ही वाघीण या नाही त्या रूपानं प्रत्येकाच्या जीवनात प्रवेश करते.

❊ तरुणाचे जीवन हे अनेक पात्र असलेले नाटक असते.

□ जगणे म्हणज झोपाळ्यावर बसून झोके घेणे नव्हे, जीवन हे वादळातून होडी हाकण्यासारखे आहे.

❀ जगात प्रत्येक मनुष्य तत्त्वज्ञान सांगतो किंवा सांगत असतो. पण ते सांगत असताना त्याचा हेतू सत्य शोधण्याचा नसतो; उलट सत्य लपविण्याचा असतो. माणसाचे तत्त्वज्ञान म्हणजे त्याने स्वतःच्या दुबळेपणावर घातलेले पांघरूण.

❊ देवाला सर्वत्र फिरता येत नाही म्हणून देवाने प्राण्यासाठी माता निर्माण केली आहे.

★ मोती होऊन सुवर्णाच्या साखळीत राहाण्यापेक्षा दवबिंदू होऊन एखाद्या चातकाची तहान भागविणे अधिक श्रेष्ठ

❊ जगातून दया व प्रेम काढून घेतले तर जीवनाचा मार्ग आपोआप आटून जाईल.

◆ चोरांना जे चोरून नेता येत नाही, राजाला बळजबरीने घेता येत नाही. भावांमध्ये ज्याची वाटणी करता येत नाही आणि ज्याचे ओझेही वाटत नाही असे हे विद्यारूपी धन सर्व धर्मांमध्ये श्रेष्ठ आहे.

卐 शिक्षणाचा उदात्त हेतू ज्ञानसंपादन करणे नव्हे तर त्यातून अमोल कृती निर्माण व्हावयास हव्यात.

संग्राहक:-**अशोक येसरे**
पदवीपूर्व साहित्य

# वसंत बापटांच्या कवितेतला निसर्ग

**ए. के. बळोळी**
प्रथम वर्ष साहित्य

मराठी कवितेत निसर्गाचा आविष्कार पहिल्यांदा केशवसुतांच्या काव्यात झालेला दिसून येतो. तत्पूर्वीच्या कवितेत निसर्गाला फारसे स्थान नव्हते. पूर्वीच्या संत, पंत आणि तंत कवितेत निसर्ग यायचा तो केवळ सजावटीसाठी, शोभेसाठी; म्हणजेच निसर्गाला प्राधान्य देवून कविता लिहिलेली नसे. काव्यात निसर्गाला स्थान असावे म्हणून जो संकेत होता त्या संकेताच्या पालनासाठी निसर्ग यायचा, म्हणजेच निसर्गाला निसर्ग म्हणून स्थान नव्हते. एक अलंकरण म्हणून त्याच्याकडे पाहिले जात होते. उपमानाच्या रूपाने तो यायचा. निसर्गाकडे निसर्ग म्हणून पाहाण्याची, त्याचे गुरुत्व पत्करण्याची दृष्टी केशवसुतांची होती. केशवसुतांनी निसर्गावर कविता लिहिल्या त्या केवळ निसर्गसौंदर्यावरील प्रेमामुळे नव्हे, तर निसर्गाकडून कांहीतरी आपल्याला शिकता येते या भूमिकेतून केशवसुतांनी निसर्गाकडे पाहिले. म्हणजेच निसर्गावर एक भूमिका लादली गेली. निसर्गाचे सौंदर्य चित्रण न होता पूजकदृष्टी त्याच्यातून व्यक्त होऊ लागली. ही दृष्टी बालकवींची नव्हती. बालकवींनी निसर्गसौंदर्याकडे केवळ सौंदर्यदृष्टीनेच पाहिले. बालकवींची स्वच्छंदवादी वृत्ती त्यांच्या निसर्ग कवितेत दिसून येते. निसर्ग खऱ्या अर्थाने आला तो बालकवींच्या कवितेतच. फुलराणी, निर्झरास, संध्यारजनी, संध्यातारक वगैरे त्यांच्या कविता अप्रतिम लावण्याच्या आहेत. बालकवींच्या कवितेत निसर्गाचे रेखाटन त्यांच्या सर्व संवेदनांसह केले जाते —रंग, गंध, नाद, रूप, रस आणि गती इत्यादी सर्व संवेदनांनी बालकवींच्या कवितेतील निसर्ग बहरून आला आहे. केवळ सौंदर्य हा बालकवींच्या कवितेतला स्थायीभाव नव्हे. बालकवींना निसर्गात केवळ सौंदर्यच दिसते. ते सौंदर्य सर्व संवेदनांसह बालकवी आपल्या कवितेत उधळून देतात. रविकिरण मंडळातील कवींनी निसर्ग कविता लिहिली पण शुद्ध संवेदनेने नव्हे. आपल्या कथा – काव्यात पार्श्वभूमी म्हणून त्यांनी निसर्गाचे रेखाटन केले. नंतरच्या अनिल, कुसुमाग्रज, बा. भ. बोरकर, मर्ढेकर इत्यादी कवींनी निसर्ग कवितेत चांगली भर घातली,

बापटांची निसर्ग कविता केवळ निसर्ग म्हणून लिहिली गेली नाही. शुद्ध निसर्गाच्या कविता म्हणून 'सरली झिम्मड', वैशाख-१, वैशाख-२, ऋतुराजांनो, रानपाखरा' वगैरे हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्याच आहेत. या कवितांतही निसर्गाच्या संवेदना व्यक्त न होता, त्या त्या वेळच्या कवीच्या भावसंवेदना व्यक्त होतात. म्हणजे येथे महत्त्व प्राप्त होते ते कवीच्या भावनांना, निसर्ग संवेदनांना नव्हे किंवा निसर्ग सौंदर्याला नव्हे. वैशाखाचे चित्रण करताना 'कळवावे ते कळवून

गेली. 'ही बेबांची दुबळी भाषा' या ओळीतून निसर्ग काही तरी सुचवतो आहे. हा कवीच्या मनातील भावच व्यक्त झालेला आहे. वैशाखाचे भुरे जिवंत चित्रण त्यात आले नाही. 'रानपाखरा' या कवितेत बालकवीप्रमाणेच बापटही कवितेच्या शेवटी रान-पाखराकडून स्वतःवर येतात. 'बाभुळझाड' हेही एका टणक माणसाचे प्रतीक आहे. 'ऋतुराजांनो' या कवितेत निसर्गाशी कवीची एकरूपता दिसून येते. कवी स्वतःला निसर्गाचे मूल समजतो; निसर्गाच्या संवेदना शब्दबद्ध करतो पण त्यात प्रत्ययकारिता येत नाही. रंगगंधासह फुलराणीमुळे जे संभ्रम निर्माण होतात तसे गोड संभ्रम बापटांच्या निसर्गकवितेत निर्माण होत नाहीत. कारण बालकवींचा निसर्ग हा प्रत्यय होता, म्हणून त्यांनी मराठीला अम्लान निसर्ग कविता दिली. बापटांच्या शुद्ध निसर्गकविता एकदम थोड्या असल्या तरी प्रेम कवितेत मात्र हा निसर्ग आपल्या साऱ्या संवेदनांसह हजेरी लावत असलेला दिसतो. प्रेमभाव आणि निसर्गभाव तिथे एकरूप होतात. निसर्गापासून प्रेमभावना किंवा प्रेमभावनेपासून निसर्ग वेगळे काढता येत नाहीत म्हणूनच 'सेतु' या कवितेतील पहाट ही शरदांतील पहाट की ती तेव्हाची तू? असा गोड, प्रश्न निर्माण करते. या कवितेतील निसर्गातील पहाट आणि कवीची प्रेयसी यांच्यात एकरूपत्व आहे. एकाचवेळी जाणू न देता निसर्गभावना प्रेमभावनेत विलीन होते. निसर्गाचे भरजरी रूप बापट अतिशय समर्थपणे (Visual) एक-रूप करतात 'अजून' या कवितेतही प्रेमभाव आणि निसर्गभाव यांच्यांत (harmony) संवाद दिसून येतो. 'अजून आपल्या आठवणीने शेवंती लजवंती होते' यातील निसर्गाच्या रूपाने प्रेमभावनेचे संसूचन अतिशय बोलके आहे. 'विचार ते' या कवितेत निसर्ग कवीच्या प्रेमभावनेला साथ करीत असल्याचे दिसून येते.' 'अपरूप' या कवितेत सृष्टीचे उदास रूप आपल्यास दिसून येते. पण ही उदासीनता याला एका तपापूर्वी फुललेल्या अपरूप रूपसंवेदची स्मृती करून देते.

"उदी टेकडचा खुरटी झाडे
मुरमाडाच्या ढिसूळ वाटा
कळंजलेला रोड गुराखी
मथ्थड ढोरें, बथ्थड घंटा"

उदी टेकडचा या एकाच कडव्यात निसर्गाचा फार मोठा कॅनव्हास बापटांनी शब्दबद्ध केला आहे. निसर्गाचे एक देखणे शब्दचित्र या कडव्यात साकार होते 'फितूर' या कवितेत जास्वंदी वारा लागून चंद्र लालम लाल होतो. ही कल्पना रमणीय आहे 'निचोत' या कवितेतही निसर्गाचे रेखीव आकर्षक देखणे शब्दचित्र आहे. 'डेलिया', फुलराणीसारखी एक देखणी कविता आहे. बापटांचा मुका पण अतिशय बोलका असा निसर्ग 'प्रियंवदा' या संगीतिकेत पहावयास सापडतो. "वारा निःस्तब्ध जरी—मधुना सुटता सुसाट, केळी–बन झोडपता. दुष्यंतापरी भिसाट" हे प्रियंवदेच्या तोंडचे कडवे निसर्गाच्या माध्यमातून तिची व्यथा अतिशय बोलकी करते.

एकंदरीत बापटांची निसर्गकविता बालकवी इतकी समृद्ध निसर्गानुभवांनी संपन्न नसली तरी लोभा-वून टाकण्याचे सामर्थ्य मात्र तिच्यात खचितच आहे. मग हा निसर्ग शुद्ध निसर्ग असो अथवा प्रेमभावनेत एकरूप झालेला निसर्ग असो.

# कोणाच्या नाटकाला काय लागते ?

मी कुठल्यातरी मासीकामध्ये वाचले होते की, मधुसूदन कालेलकर यांच्या 'हा स्वर्ग सात पावलांचा' या नाटकाच्या शत होत्सवी प्रयोगाप्रसंगी भाषण करतेवेळी त्यांनी आपल्या नाटकाला काय काय लागते ते सांगितले होते त्यांच्या नाटकाला पडदे व बबन प्रभु या गोष्टी लागतात. ---

तसे पाहायला गेले तर प्रत्येक नाटककाराच्या नाटकाला काही न काही लागत असतेच पण कोण ते बोलून दाखवत नाही. कालेलकरांनी ते बोलून दाखविले. यामुळेच कालेलकरांच्या पाऊलावर पाऊल ठेवून प्रत्येक नाटककाराने आपल्या नाटकाला काय काय लागते हे बोलून दाखवले तर कोणी काय सांगेल याचे एक गमतीदार चित्र डोळ्यासमोर उभे राहाते त्याचीच एक झलक:—

१) **विजय तेंडूलकर :–** 'शांतता, कोर्ट चालू आहे', 'गिधाडे' या माझ्या नाटकांना सध्या लोटणारी अलोट गर्दी पाहून माझ्या नाटकांना प्रेक्षक लागतात, असा अनेकांचा गैरसमज झाला असेल पण ते खरे नाही. कालेलकरांच्या पावलावर पाऊल ठेवून माझ्या नाटकाला काय लागते हे सांगायचे झाले तर मी एवढेच सांगेन की माझ्या नाटकाला लागते फक्त गरोदर बाई अन् गर्भपात.

२) **बाळ कोल्हटकर :–** माझ्या नाटकाला एक तुलशीवृंदावन व लोणचे (बेडेकरचे नव्हे तर घरगुती) या दोन गोष्टी नेहमीच लागतात 'आणि त्याच्या जोडीला–एक ताई-स्वतः नाटककार बाळ कोल्हटकर.'

३) **पु. भा. भावे :-** कोणाच्या नाटकात काहीही लागो पण माझ्या नाटकात एक पतिव्रता नेहमी लागतेच. तिच्याशिवाय माझे नाटक पुरे होत नाहीच.

४) **वसंत कानेटकर :-** माझ्या नाटकात दाढी, मिशा, तलवारी, जिरेटोप आणि त्याबरोबर बखरी लागतात.

५) **राजाराम हुमणे :–** माझ्या नाटकाला टॉपलेस कपडे व पुष्पा भोसले या दोन गोष्टी लागतात.

६) **विद्याधर गोखले :–** माझ्या नाटकाबाबत बोलावयाचे झाले तर मिर्झा गलिब, मोर बहादुरशहा 'जफर' हे मला लागतातच यांच्या शेरशायरी शिवाय माझे नाटक पूर्णच होत नाही.

७) **मधुकर तोडरमल :–** माझ्या नाटकाला मांजर, गुलाबाची फुले हा लागतातच. हे 'सिम्बॉल' नसतील तर भोवऱ्यात सापडल्यासारखी माझ्यातल्या नाटककाराची अवस्था होते.

८) **वसंत सबनीस :–** माझ्या नाटकात प्रामुख्याने म्हैस व मावशी लागतेच.

९) **बाबुराव गोखले :–** कोणाच्या नाटकाला काहीही लागो पण माझ्या नाटकाला पंचाग हे लागतेच.

१०) **पुरोषोत्तम दारव्हेकर :-** माझ्या नाटकात चेटूक, शिडी, अपघात या गोष्टी लागतातच.

११) **श्री. ना. पेंडसे :-** माझ्या नाटकात कोकणची माणसे लागतात. मग ते नाटक कोकणच्या पार्श्वभूमीवर असो वा मुंबईच्या.

**आण्णासाहेब बा. स्वामी**
प्रथम वर्ष वाणिज्य

# कोणाच्या नाटकाला काय लागते ?

मी कुठल्यातरी मासीकामध्ये वाचले होते की, मधुसूदन कालेलकर यांच्या 'हा स्वर्ग सात पावलांचा' या नाटकाच्या शत .होत्सवी प्रयोगाप्रसंगी भाषण करतेवेळी त्यांनी आपल्या नाटकाला काय काय लागते ते सांगितले होते त्यांच्या नाटकाला पडदे व बबन प्रभु या गोष्टी लागतात. ---

तसे पाहायला गेले तर प्रत्येक नाटककाराच्या नाटकाला काही न काही लागत असतेच पण कोण ते बोलून दाखवत नाही. कालेलकरांनी ते बोलून दाखविले. यामुळेच कालेलकरांच्या पाऊलावर पाऊल ठेवून प्रत्येक नाटककाराने आपल्या नाटकाला काय काय लागते हे बोलून दाखवले तर कोणी काय सांगेल याचे एक गमतीदार चित्र डोळ्यासमोर उभे राहाते त्याचीच एक झलक:—

१) **विजय तेंडूलकर :–** 'शांतता, कोर्ट चालू आहे', 'गिधाडे' या माझ्या नाटकांना सध्या लोटणारी अलोट गर्दी पाहून माझ्या नाटकांना प्रेक्षक लागतात, असा अनेकांचा गैरसमज झाला असेल पण ते खरे नाही. कालेलकरांच्या पावलावर पाऊल ठेवून माझ्या नाटकाला काय लागते हे सांगायचे झाले तर मी एवढेच सांगेन की माझ्या नाटकाला लागते फक्त गरोदर बाई अन् गर्भपात.

२) **बाळ कोल्हटकर :–** माझ्या नाटकाला एक तुलशीवृंदावन व लोणचे (बेडेकरचे नव्हे तर घरगुती) या दोन गोष्टी नेहमीच लागतात 'आणि त्याच्या जोडीला–एक ताई–स्वत: नाटककार बाळ कोल्हटकर.'

३) **पु. भा. भावे :–** कोणाच्या नाटकात काहीही लागो पण माझ्या नाटकात एक पतिव्रता नेहमी लागतेच. तिच्याशिवाय माझे नाटक पुरे होत नाहीच.

४) **वसंत कानेटकर :–** माझ्या नाटकात दाढी, मिशा, तलवारी, जिरेटोप आणि त्याबरोबर बखरी लागतात.

५) **राजाराम हुमणे :–** माझ्या नाटकाला टॉपलेस कपडे व पुष्पा भोसले या दोन गोष्टी लागतात.

६) **विद्याधर गोखले :–** माझ्या नाटकाबाबत बोलावयाचे झाले तर मिर्झा गलिब, मीर बहादूरशहा 'जफर' हे मला लागतातच यांच्या शेरशायरी शिवाय माझे नाटक पूर्णच होत नाही.

७) **मधुकर तोडरमल :–** माझ्या नाटकाला मांजर, गुलाबाची फुले ही लागतातच. हे 'सिम्बॉल' नसतील तर भोवऱ्यात सापडल्यामारखी माझ्यातल्या नाटककाराची अवस्था होते.

८) **वसंत सबनीस :–** माझ्या नाटकात प्रामुख्याने म्हैस व मावशी लागतेच.

९) **बाबुराव गोखले :–** कोणाच्या नाटकाला काहीही लागो पण माझ्या नाटकाला पंचाग हे लागतेच.

१०) **पुरोषोत्तम दारव्हेकर :–** माझ्या नाटकात चेटूक, शिडी, अपघात या गोष्टी लागतातच.

११) **श्री. ना. पेंडसे :–** माझ्या नाटकात कोकणची माणसे लागतात. मग ते नाटक कोकणच्या पार्श्वभूमीवर असो वा मुंबईच्या.

**आण्णासाहेब बा. स्वामी**
प्रथम वर्ष वाणिज्य

# दुरड्या

**श्यामलकांत गवस**
द्वितीय वर्ष साहित्य

सत्तूनं गाडी देवळाला आणून हुभा केली कुणी-तरी आबाच्या घराकडं सांगावा पोचीवला. तशी माणसांची गर्दी देवळाकडं निघाली. भेंडवाले बाप्ये तरातरा साहित्य घेऊनशान आले आनी बाजवायला सुरवात झाली. लेझिमवाल्या पोरांनी ताल धरला. फुला लक्ष्मीच्या पाया पडून गाडीत आली. देवळात गेलेल्या सगळ्या बायका गाडीत चढून बसल्या. एक झण्णाटपैकी गाणं झालं आनी लेझिमवाल्या पोरांनीबी कपाळावरचा घाम पुसला. इतक्यात गॅसबत्त्या आल्या आनी आबानं सत्तूला आर्डर दिली; तशी गाडी वाजत–गाजत आबाच्या घराकडे आली. चिल्ली–पिल्ली भेंडाच्या गाण्याकडं जीव वतून लक्ष्य दित व्हती. बाया, बापय आनी बारक्या पोरांनी गल्ली गच्च भरली व्हती. आबाची खिलारी खोंडे शांत समाधानानं भेंडाच्या पाठीमागून जाईत व्हती. तेंच्या कपाळावरची भींग बत्तीच्या उजेडात झळकत व्हती. हरणागत शिंगावरनी टापऱ्यांनी बांधलेल्या चौऱ्या चमकत व्हत्या नवीकोरी रंगीवल्याली गाडी आनी त्येच्यात बसलेल्या बायकांच्याकडं सगळी बघत व्हती फुला सगळ्याच्या मधी बसलीती.

गाडी घराजवळ आली. सत्तूनं कासरं वढत वढत बैलास्नी हो घातला आनी बायका गाडीतनं उतारल्या. फुलाबी हळूच उतारली. बत्तीच्या उजेडात तिच्या हिरव्यासाडीची किनार लकाकली. हिरव्या चुड्याचा आवाज झाला. म्हादू उजदारला आला. फुलाकडं बघूनशान एक लांबलचक सुस्कारा सोडला. जणू काय सगळ्या जीवनाचं सार्थक झालं त्येच्या ! गाडीतनं आकरा दुरड्या काढून बायका घरात घेऊन गेल्या— फुला घरात गेली, पयल्यांदा देवघरात जाऊन पाया पडली. दोन देवांचं टाक, सा फोटू पन झक्कास पैकी बसवल्याले. सोज्वळ उजेड देणारी पणती आनी उदकाडीचा सुवास. खोली लई चांगली वाटत व्हती. पूजा करायचं सामानसुमान येवस्थीत फळी मारून ठेव-लेलं व्हतं. तिथनं ती वडीलधाऱ्या माणसांच्याकडन आशीरवाद मागत चालली अगदी अहंता सोडून—

तानवा मद्दाम दारात यिऊन बसलीती. तिच्या तळपायाची आग मस्तकाला जाईत व्हती. येड्यागत पुटपुटत व्हती चुलीजवळ बसलेल्या नवऱ्याला सगळ्या बातम्या आतनं बाहीर आना बाहीरनं आत करीत सांगत व्हती. येवढ्यात बायजाकाकी पदर सगळं करीत आली आनी म्हटली ... "निवांत बसलीयास तानु ऽ.. म्हंजे जरा लांबलांबच का - ?"— तिला वाटलं ही बया बसली आसल 'बाहीर' वाऱ्याला. न्हाई-तर काय सगळं गाव आनंदात हाय.

"ये ऽ की गं काकी " तानवा जरा मोठ्या आवाजातच म्हणाली, "येवढी कसली घाई लागलीया पाठीमागनं "

"आगं हितच आलूया भाऊबंदाच्यात तुझ्या.."

"तरी म्हंत्यात ते बी खर हाय, वल्या संग वाळलं आनी वाळल्या संग वल्लं. कुठलं भाऊबंद आमाला ठाऊक न्हाई - !"

"म्हजे....?" बायजा जणू काय म्हाईत नसल्यासारखं त्वांड करून म्हटली, "आसं का बोलतीयास तिनी सांजचं ..?"

"इसारल्यासा व्हय लगेच---? काय राकलंय तेनी ह्या घराण्याचं..? निव्वळ म्हाराचं घर धुसल्यात.. म्हाराचं -- बघीटल्यासा नव्हं डोळ्यानं ...?" तानवा आवाज चढवून मानेला तिरगेमुरगे दित तणतणाय लागली. "सगळं इसरून तुमी चाल्यासा मागचं पुढचं. आन शिजत न्हाई तुमच्या घरातनो आसं ---काय राखल्या तेनी मागं---? निव्वळ कडव्याची पोर करून आणलीया. लग्नात कसं केलं गावानं तस का करत न्हाईसा म्हंतो -- !"

"पन झालं गेलं गंगंला मिळालं पयलं काढायचं आनी परड्यात रडायचं दिस गेलं आत्ता तानवा ..." समजून घालत मोडा घालायच्या बेतात म्हणाली, "तुझं बी खरं हाय आता दिस गेलं ते माज्या सोनी ..."

"दिवस न्हाई गेलं, दिस उगवायचा तसा उगवतोय मावाळतोय पन माणसंच उरफाटचा काळजाची झाल्यात; म्हणूनशान पाऊसपानी व्हईना बघ !! खरं म्हंजे, 'त्येंच्या' तलं पानी सुदीक प्यायचं न्हाई. पाट झाल्याल्याच्या घरावरनं-दारावरनं तीन दिस जाईत न्हाईत; काय वाकडा डोळा करून बघत न्हाईत ! आनी हे काय बघा आत्ता ..." तानवाचं बायजाला पटाय लागलं आनी घशातल्या आवाजात ती काय तरी सांगाय लागली....

"सगल्यास्नी भेटलीस काय--- ?" म्हादूनं फुलाला ईच्चारलं तिनं मान हलवल्याली बघून तो म्हणाला.

"काकूच्या घरात गेलीस -- ?"

"न्हाई ..."

"का ?"

"पयल्यापास्नं...."

"ते सगळं इसरायचं आता, जा !" गावातल्या दोन बारक्या पोरीसह फुला तानू काकूच्या घरात गेली. तिची पोरं आनी दादला चुलीजवळ बसलीती. तानू बायजाला सांगत व्हती कायतरी. फुला हासतच म्हणाली.

"काकू काय करायलासा ...काय जरा खायच्या बाजूला यायचं न्हाई.

"व्हय....?" आनी तिनं तिच्या पायाला हात लावला तसी ती मागं सराकली आजी फणाकरली, सावज चालून आलं व्हतंना --

"कोण तू सखी..? कुणाच्या पाया पडतीस..?" फुला फक्स्त बघतच न्हायली. तिला काईच समजनां. मनांत वाटू लागलं उगीच आलो ...

"कडव्याच्या घरची तू नावबुडवी. पयलं हुंबऱ्याच्या बाहीर हो..!" काकूच्या शब्दानं तिचं काळीच धस्स झालं. डोळ्यात टच्चकिऱ्यान पानी आलं, सोबत आलेल्या दोन पोरींच्या संगट उंबऱ्या बाहीर पडली. दांडगा वाघ मारल्यागत तानूकाकू आपल्या नवऱ्याकडं बघत हासली आनी सगळीच "भलं केलीस" म्हणत फिदीफिदी हसाय लागली ...

फुला मुसमुसून रडाय लागली. कुणीतरी म्हादूला सांगितलं जवळपासच्या बायका ईच्चारपूस कराय लागल्या. कुणालाच काय समजना. आक्कीरिला म्हादूनं गडबडीत इऊ ईच्चारलं. पन काय बोलंना. शेवटला दोन बारक्या पोरीनी सगळं सांगितलं म्हादू काय बी बोलला न्हाई. फक्स्त एवढंच म्हटला 'रडू नकोस.' आनी आपल्या कामाला गेला. हळूहळू

बायकांचा बापयांचा घुळका फुला भोवती जमला जातो. ईच्चारू लागला झालं. काय तर कोणच बोललेलं गत-ध्यान कुणाला कळंना. बाहीर भेंड बंद झाला हालगी गार झाली. लेझमाची पोरं घरात घुसली. बाहीर तानूकाकूला चेव चढला व्हता. जीभला हाड न्हायलं नव्हतं गल्लीतल्या तिच्यासारख्याच बाया तानूला दुजोरा दित व्हत्या.

काकूचं हे मधीच उठूनशान मानगुटीवर बसल्यालं भूत बघून म्हादू भांबावून गेला; आपुनच खोचरून आवदाना आनल्यागत वाटलं. तोंडाला त्वांड देण्याची ही वेळ नव्हं हे वळकून हसतच म्हटला.

"तुझं म्हणनं तरी काय हाय काकू ..?"

"कळून न कललं करणाऱ्याकडनं काकू म्हणून घ्यायला खूळ लागयला न्हाई." तुझ्यामळं आमाला त्वांड दाखवायला लाज वाटतीया; भाडचा, घराण्याची नापत घालीवलास!! आसली पाटाच्या घरची काळी चिचुंद्री करून घ्यायला काय उपलाऱ्याचा कृतास व्हय रं X X X!!" म्हादू मूग गिळून ऐकत व्हता

भांडणाचा गलगा खूप लांबवर घुमला. गाडीबैल मळच्यात घालवायला गेलेला आबा आनी सत्तूच्या कानावर पडला. दोघंबी काय भानगड म्हणत धावपळ करत आल्यानी. तानबाचं आनी म्हादूच्या आईचं जंगी भांडाण लागलं व्हतं. शेजारपाजारीबी दोन-पार्टीनं हुभी व्हती. आबानं आल्याबरुबर सगळी चौकशी केली पण नीट कोणंच सांग ना. येवढ्यात तानबाला आबा आल्याचा सुगावा लागला. आबा पयल्यांदाच गराजला

"काय झालं रं म्हादू ..?"

"सांगा ह्या घिरण्याला आनी थुका पचाचा पानं खाऊन दारावर!" आबाचा राग आधीच वाईट व्हता. आजपतुर घिरण्या म्हणणारा, वाईट शब्द बोलणारा जन्माला आला नव्हता. पन आज...! आबाच्या डोळ्यातनं इस्याच्या ठिकऱ्या पडाय लागल्या. रागाचा भडका उडाला. पाडव्यापास्नं धुमसत घातलेली पाटीलकीची आब्रु उधळून दित आबा सरसावला, त्यो शब्दाचा बंदा नव्हता....

"ही काय म्हंती भोरडी....घिरण्या म्हंती मला....? सोडा रं मला S टाळकं बस्ताऱ्यानं भादरून टाकतो हिचं!!" १०–१२ जनांनी आबाला गच्च धरलं. अत्तापतुर चुलीला शेकत बसल्याला बंडा खवळून फरशी घिऊन आला.

"कुठं हाय तो टाळकं भादरणारा न्हावी....? कुराडीच्या घावात मात तुकडं करतो....!!" खवाळलेला बंडा बाहीर आला. बारकी पोरं दूर पळाली बायका लांब गेल्या. येवढ्यात तिघा चौघांनी त्येला धरला. फरशी हिसकून घेतली. बारकी पोरं, बायका म ठ्यांनं रडाय लागली..एकच..गोंधोळ..सूड..

भेंडवाल्या नि लेजमाच्या पोरांनी सगळ्यांना शांत केलं. बंडा आनी तानूला त्येंच्या घरात घातलं आनी बाहीरनं कडी घातली. आबाला देव घरात कोंडून घातला उदास म्हादू माजघरात आला अचा-नक त्येची नदार परड्याकडच्या पेटत्या पाकाड्याकडं गेली! बत्ती भडकून घराला जोरात आग लागली. त्येच्या हातापायाकडणं काळंपानी गेल्यासारखं वाटलं. पन आपल्या आपूनच सावरत मुकाटपणानं घरातल्या वाकळा पाण्याच्या हौदात बुडवून इझवायच्या धडपडीला लागला....

फुली काळीकुट्ट डांबरातनं बुडवून काडल्यागत. पांढराशुभर भाग ह्यो मिळणारच न्हाई! आपवाद घ्यायचा म्हटला तर डोळ्याचा पांढरा पडदा आनी हासतांना लांबून बघितल्यास येडवान दावल्यागत उठून दिसणारं दात येवढंच काय!, गोल चेरा आनी आखूड पन पुढं पसरत गेलेलं नाक, पलकूर झंपर घालून ढोरं राखायला यायची तवा आमी तिला लई चिडवत असू. आनी आक्कीरिला तिनं चिपलीला हात घातला की डाव बंद आमचा!

—फुली मेथीच्या भाजीमारखी बाढीला पडली पलकर झांग जाऊनशान लगडं नेसायला लागली. ती दांडग्या बाईगत दिसू लागली. तशी ती ढारं घिऊन यायची बंद झाली तवा कुठं हाणम्याच्या हाडाला जरा पालवी फुटली! मला मातुर चुकल्याचुकल्या व्हया लागलं वढा बसाड पडला.... तसी ती पाण्याला गेल्यावर, वढ्याला धुयाला आल्यावर दिसायची पन.... चिडवायला संधी मिळायची न्हाई मी बी शाळा शिकत असल्यामुळं उनाडक्या थांबल्या आनि डोचक्यात इच्चार पडाय लागला, कशाला नकावडच्या पोरागत दंगा, खोड्या करायच्या....? ते काय बरं असतंय व्हय....!!

....फुलाच्या काळ्या रंगाला एक नवकं पानी शोभून दिसाय लागलं कपाळावरची टिकली आता कुंकू झाली. नाकात चमकी इवन झळकू लागली. आता मातुर मला ती कधीतरी दिसाय लागली. सकाळच्यापारी उठून इयानपानी करायचं भाकरी खावून दिडक्या पगारावर छ्याडा कसायचं. कडुसं पडल्यावर इवूनशान आईला सैंपाकाला हात लावायचा. सगळा शीण रातरी आकरा-बाराला हातरूनावर आंग टाकून घालवायचा. कधीमधी कुणाचं बारसं आसलं तर तोंडानं पाळणं म्हणायची गोड गळ्यानं. लग्नाच आसलं तर जाळं टाकत रुकवत वाणायची. नवऱ्याला नवरीला नावं शिकवायची. पन करवलीचा मान कधीच मिळायचा न्हाई फुलीला रूप नसलं तरी मेंदू चांगला घातला व्हता मनगटात चार माणसाचं कुटुंब पोसायची ताकद देऊन निलं धाडलं व्हतं. कधीच ती कामाधंद्यात मागं पडल्याला मी ऐकलं न्हाई हिशोब-ठिशोबाच्या बाबतीत सराईत व्हती चांगल्या हुशार टाळक्याच्या पोरालाबी हारवून टाकायची! राहून राहून मला वाटायचं सातवीपास्नं पुढं शिकली असती तर चांगली नोकरीही केली असती! राज सकाळी रामाधर्माच्या पाऱ्यात मी वाचायला उठलो की तिच्या जात्यावरल्या वळचा, गाणी येडपटागत ऐकायचा परतपरत गाणी म्हणायची न्हाई इतकी गाणी तोंडपाठ व्हती!!

फुलाचं घर आमच्या घरापास्नं जवळच व्हतं. सकाळच्या—पारी बैल बारं सुटलं की मला तिच्या गाण्याचा शब्द खडा आनि खडा मारल्यासारखा ऐकू यायचा गावात गिरणी असूनबी हौसन दळणारी फुला! आठ दिवसाचं दळलं तर आरध्या दिसाचा पगार निघतोय असा तिचा हिशोब!!

भर उन्हाळा पडला व्हता. उन्हाची तिरीप माणसाला व्हरपळून काढत व्हती झाडावर पालवी येत व्हती. वढ्याचं पानी आटलं व्हतं. खॉल डोन्हाच्या ठिकाणी कुठं तरी थोडंपानी तग धरून होतं. माणसं जगायची मारामार! अशातच दुपारी घामाच्या धारा गाळत फुलाचा मामा आला. बऱ्याच दिसानी आल्यामुळं हिकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. बोलता बोलता फुलाचा ईषय पावण्यानं काढला.

"काय फुलाच्या लगनाचा बातबेत...?" पाव्हना.

"हाय तर! पन ऽ कुठं जमच ना झालंय..." फुलाच्या बाबानं उत्तर दिलं.

"जागं येत्यात पन पोरगी बघितली की हुंडा मागत्यात!"

"मग कुठवर मागितला कुणी कुणी...?"

"एक जागा व्हता पोरगा साडे-तीनसे रुपयाच्या पगारावर व्हता हुंडा चार हजार आनि सोनं तोळाभर म्हणत व्हता! दुसरा एक पांगळा शिपाई व्हता हायस्कूलात अडीच हजार हुंडा आनि भर पेराचा; तांदूळ टाकूनबी आमीच द्यायचं म्हनत व्हता!"

"मग जमलं का न्हाई?" पाव्हना हासत मिशीवर हात फिरवत म्हणाला, "हल्लीच दिस म्हंजे पैशावरचा ख्योळ! कस्सं म्हंता..? तसा थोडाफार हुंडा द्यालाच पाजे म्हना..."

फुलाच्या बाबानं नुसती मान हालीवली. लगेच मनाला टाळा करत पाव्हना म्हणाला, "मी बी ह्याच

कामासाठी आलती....'' फुलाच्या बाबाच्या तोंडाला पानी सुटलं. "म्हंजे कुठं नवीन जागा बिगा हाय व्हय..?'' पाव्हना फकस्त गालात हासला. आनी उघडच फाट्दिशी म्हटला.

''येरवी फुलाचंबी कुठं जमत न्हाई, तवा आमच्या दुड्याप्पाला... म्हंजे हिकडं जुनं पाव्हनं राखल्यासारखं व्हईल आनि दोघांचाबी लिंब निघंल....कस्सं...?'' हे आईकल्या बरूबर सगळ्यांची तोंडं काळी ठिक्कर पडली. दुड्या तसा रूपानं नव्हता पन येडपट व्हता. टाळकं फिरल्यासारखाच कुटं गटाराचं पानी पी. कुटं उट् खरकाटं खा. कपडं तरी रटाळ झाल्याली सदा. सात कुराडीनं तुटायची न्हाईत असी! तिरप्या डोळ्याचा, वाकड्या हाताचा दुड्या पंचीस वर्साचा पन श्यानपन हे न्हाईच मळात त्येला! आसपासच्या खेड्यात ना 'खुळा दुड्या' म्हणून नावाजलेला व्हता. अशाला पोरगी द्याची म्हंजे तिचा केसानं गळा कापल्यागत. तिच्या (फुलाच्या) बाबानं आनि आईनं सरळसरळ न्हाई म्हटलं. तसा पाव्हना चवताळला. कुत्र्यासारखा पायजेल ते भकू लागला. आनि उठूनशान हुभारून धमकी दिली

''हिचं लगीन कस्स करत्यासा ते मला बघायचं हाय..!''

''आमच्या घरात तसी न्हायली तर बिगडत न्हाई. पन दुड्याला म्हनून देनार न्हाई हिगीत ढकलून दिन पन तुज्या साजऱ्या ''दुड्याला देनार न्हाई!!'' फुलाची आई तणतणत खरी गोट सांगू लागली— ''आनि समज पोरगाच व्हवून जल्माला आला असता तर...?'' सगळीच गोडगप्पा-टप्पा करणारी भलीभावडं एकमेकाची अक्कल काढायला लागली. आत्याबाईला म्हटला.

''कर कर तूनी. मला वा बघायचं हाय...'' आनी तरारा निघून गेला फुला उदास मनानं तापलेल्या वाटंकडं बघायला लागली. उतरत्या किरणाच्या झळांचं झटकं उबदार वाऱ्याच्या झपाट्यानं बसत व्हतं.

गणपतीचा सण आला. समदं शिवार हिरवंगार झालं व्हतं. पावसानं सुखावलं व्हतं. थंडगार येवानं तरतरीत झालं व्हतं. वाऱ्याच्या झुळकंबरबर खेळ-खंडोबा करत व्हतं. गौरीला फुलं ईत व्हती. मिरचीच्या झाडालाबी फळं धरत व्हती. हिरव्यागार वाटांत हिरव्या मिरच्या उठून दिसत नव्हत्या फुलंच काय तेवढी! फुलाच्या मैतरनी ववसा चिकून आल्या व्हत्या गप्पा मारायला तिनीसांचं फुलाजवळ यायच्या मनभरून हसत सासरच्या गोटी सांगायच्या. पाडव्याला लगीन झाल्याली कासू कितीतरी सुधारली व्हती. तिचा नव्हरा सायेब हाय. कासू किती लाजत व्हती. सांगतासांगता स्वतःच हरवून जात व्हती. तशाच त्या 'शारा' आनि 'पारा' दोघींच नव्हवरं नोकरदारच. दिसायला दोघीबी देखण्या व्हत्या. फुलाच्या मागनं उपाजल्यालया पोरी कशा नटून थटून आल्यात! शारूनं तरी आसपासचा कानोसा घेत हळूच कसं सांगितलं, ''फुलाक्का, आता मला दिस गेल्यात...तीन म्हैनें झाल्यात..'' पारूतर बाळंतपणालाच आली व्हती. सगुनी कड बगूनशान फुला मनात झुरायची. तिच्या वारगीची ती, तिला तीन पोरं झाल्यात... फुला नुसत त्येंची त्वांड भरून बोलणी ऐकत व्हती.

फुला गडबडीनं सारं आटपून गणपतीच आनी म्हणायला पारूच्या घरात गेली. तसं ते ऐसपैस. दर-साल तिथं बायकापोरी गवर घुमवायला जातातच. खूप खेळायचं, गानी म्हणायची गप्पा मारून दिवसाचा घालवायचा ह्या दिसात. तसा फुला गम्मत करायची म्हणून बायकाच्या गचडीत एका कोपऱ्यात लपून बसली. बघायचं व्हतं तिला. आता कोण आठवन कान काढतंय.

''फुला कुठं खेळाया आली न्हाई ग शारू ऽ बलवाय जावू या का बग...'' सगुनी.

''हू ऽ बलवायचं! पाजे तर ईल की!'' शारू.

''आगं तिच्या लगनाचं कुठं ठरलं का न्हाई...?

पाप बिच्चारी ! राबायला धाकट, चिवट हाय बग.'' सगुना चुकचुकत म्हणाली.

''लगीन झालं अस्तं म्हंजे बरं झालं अस्तं.''

''हं पाप काय बीप. लई खवाट हाय रांड म्हणून देवान अशी ठेबलीय बग ! लग्नाच्या आदागर माझी आबू क ढलीन बग, भांडायला लंबर एक हाय'' कासू.

''आनि मी बी एकदा धुयाला गेल्तो तवा एका दगडापायी काय काय बारासेबात्तर बोलली मला मी बोलत न्हवतो पन माज्या लगनात आपुनच दात ईचकून आली बग... '' पारू.

'आसल्या काळचा घुम्मंला कोन गं करून घिल ·· ? कुट तरी पाटंच लागायचा तिचा !'' शारुनं साद घातला.

फुला गुमान उठली. बाग्क्या पोरीस्नी बाजूस सारत वाट करत गेली. दार उघडलं, निगून गेली. सगळ्यां तोंडात बोट घालून बगत बसल्या. बाहेर रिमझिम पावसाचं जळमट पडत व्हतं ···

फुलाचं आनि तिच्या आई–बाबाचं सुदिक पटना फुली ह्यो एक धोंडा आपल्या डोक्यावर हाय तवा हिचं लगीन व्हतय असं वाटत व्हतं. नकावडचा कारणातनं दरवर्षी तावदारून भांडायची. फुला एकटीच व्हती कुण्णाकुणाच्यात मिसळाव असं तिला वाटायचं न्हाई. तिला कोन मिसळूनबी घित नव्हतं. पन फुला कुणावर चिडली न्हाई. काम केल्याशिवाय जेवली न्हाई.

- फुला तशीच परत आली. मनात नाना-ईच्चार उटत व्हते. खीनभर वाटायचं त्येच्यात काय यवढं ? मातीचं भांडं आनि अक्काल सांड ! त्येच्यात एवढं काय....पण आई शिवा द्याली तर ? भिजल्या अंगाची फुला रिकामीच परत आल्याली बगूनशान बाबा भडकला, ''घागर काय झाली .. ?''

''पावसाच्या पिरपिरीनं निसरट लंई झालीया पाय निसटला माजा.'' फुला सावरत म्हणाली. ''आनि घागरीसकट मी पडली.''

''इतरांच्या पोरी पानी आणित न्हाईत वाटतं..'' आई लालडोळं रोकत म्हणाली, ''न्हाई, सदानीकदा धांगडधिंगाना असतोय हिचा····खाद जास्ती झालीया हिला ···''

''पडल्याली पडली एवढी कशाला तणतणतीस..'' फुलाला आवरलंच न्हाई ह्येनी बाजाराला जावून पैसे टाकावंत. वीस पंचवीस रुपयाचा बाजार घालवून यावा आनि एक घागर फुटल्यावर शिवा द्याव्यात हे ती म्हणणार पन बाबा लगेच गुरकावला.

''खाऊन सुस्ती चढलीया म्हणून असं व्हतंय आनि उलटं बोलायला मस्ती येतीया न्हंव काय....?''

··सगळं शिवार वसाड पडलं. ढासं वारं सुटलं. आंग फुटाया लागलं. मानसासारखं मानूस ईद्रुप व्हयाय लागलं थंडीनं. जिकडं तिकडं बोडकी झाडं हुभी व्हती. ना पान ना पाकळी. हिरवळ न्हाई की दरवळ. वाटा वाळून खडखडल्या. खडं उठून, फुटलेल्या पावलास्नी दाभनागत बोचू लागलं. शेतातली कामं आटापली व्हती. कामं करायला कामच न्हाई. कुटं भावी काढायच्या, घरं बांदायला सुरवात झाली .. फुलाला आईबाबानी बाळान्नाच्या भावीवर तिरपाटलं. 'उगीच घरात मेलेल्या मडचागत बसती,'

एका फाटक्या बुट्टीचा तळका घिऊन वाळून कोळ झाल्याली फुला बाळान्ना पाटलाच्या भावीवर कामाला गेली सगळी मानसं तिच्याकडं बगून फिदिफिदी हसाय लागली. बायकांनी डावच टाकला. तिला आपल्याजवळ घ्यायला कोनबी तयार व्हईना. येवढ्यात एकटी म्हटली, 'फुली ऽ, बुट्टीच्या वजनाइतकी तरी न्हालीस हाईस कामाला येतीस..?'' फुला चिडली. देस तसा येस आनि उफराटं लुगडं नेस म्हनून फुला निसाफली—''मालक भावीचा बोलत न्हाई, आनि तुमच्या का उरावर बसालोय मी..?'' ''मरायच्या वाटंला लागलय पन बोलायला अैकतंयका बग..'' आनि सगळ्या बायका हसाया लागल्या. दिवसभर

तिला कुणीच मिळवून घेतलं न्हाई. भावीतल्या गढ्यानबी तिला अवकाल घरवासाठी दांगड्या बुट्ट्या भरल्या पन फुला डगमगली न्हाई.

दुपारी म्हादू भावीवर गेला. त्येच्या मनात ह्यो सगळा परकार आला. त्येनं बुट्ट्या भरणाऱ्यास्नी कमी भरायला सांगितलं आनि बापयगडी प्वॉट भरून हसाया लागलं....

फुलाला कुनाला ठावं उदास वाटाय लागलं. काम संपलंय तरीबी घरला जावसं वाटचना. तसं घरला जायाला आरधा तास तरी ववकळ लागतोच; दोन गावचं शिवार तुडवत पन ती वढ्याच्या काठाला निवांत बसली. वढ्यातलं पानी पार आटून गेलं व्हतं. पानांचा पालापाचोळा झाला व्हता. अंधुक कडुसं पडत व्हतं पांढरं कावळं आभाळातनं जात व्हतं. फुलाच्या मनात हजार प्रश्न ईत व्हते-'जगायचं कशासाठी ? का....? कोन हाय आपलं ? जावं कुट....? जाव द्यावा कुट तरी !....?....? !!'

तिच्या पाटीमागचा पाला वाजला कोन तरी ईत व्हतं. कोन आसल..? भूत ? ह्यो मसवटा हाय. मढी पुरल्यात जाळल्यात..त्येच्यातलंच एकारदं उटलं आलं तर ..? तिच्या काळजात धस्स झालं वाटलं पळून जाव. पन परत मन घट्ट झालं 'मरायचं हाय न्हवं तुला मग भिनार कुणाला-? का भ्यायचं-? तीा जागची हाल्लल न्हाई.

म्हादू ग प हुभारला. 'बसल्यालं कोन—? भूत आसलं—?—छे माझ्या नादाला ईल ते !!!' शेवटला त्येनं धाडसानं ईच्चारलं, 'कोन त्ये—!" फुलानं माग वळून बगीतलं तं काय बोल्ली न्हाई. पारखंत म्हादू म्हनाला—"कोन फुला—?"

"हूं ऽ—"

"हतं का बसलीयास—?"

"बसलो उगीच—" फुलानं डोळं टिपत म्हटलं आनि उटून हुबी न्हायली.

"आई घरात वाट बगत आसल की—काय म्हनार न्हाई—? जा घरला—"

"ती सदाच माझ्या मुळावर बसलीया—!" फुलाला का कुणास ठावं रडूच आलं ती हुंदकं आवरीत म्हनाली, "आता—!" म्हादू मधेच म्हनाला, "कोन भांडलं का तुज्यासी—?"

"सारीच भांडल्यात माझ्याबरूबर—" आनि ती ओक्साबोक्सी रडाय लागली. काळीज पिळवटून येनारं पानी त्या अंधारतही लकाकलं. ता रडकी कथा सांगाय लागली जनू तो कुनीतरी तिचाच व्हता. आनि त्याच्यावरचं रामदास बशीद त्येच्याकडंच व्हतं. काय आजपत्तुरच्या कसाई दुनवेतला अनाहा मानूस व्हता—?

" बाळाप्पा पाटील म्हंजे अंगापिंडानं धडधाकट चार चौघात उटल्याला बसल्याला शाहिरी रुबाबाचा फेटा आनि न्हेरू शर्ट आनि धोतर. गोल चेहऱ्याच्या मधी लांब मोठ्ठ नाक पन आखूडच वाटायचं. मुस्काटन दांडगं. गालफडाची हाडं न्हाईत असं वाटायचो व्हटावर दोन बकऱ्याची लोकर कापून ठेवल्या सारख्या मिशा ! आनि किलकिलणारे बारीक बारीक डोळं; रागाच्या ववताला येडापिसारकं व्हायचं. हातात कायम फरशी. चालण्याचा ढंग असा को धाडधाडीत आल्यागत समोरच्याला यक लाथ हानली तर चार गोलांटचा खाईल अशा रूबाबात. तसा त्याचा गावात लई मोठा दरारा व्हता. आबा म्हटलं की थरारा कापायची सगळा !

म्हादूबी बाप तसा बेटा आनी कुंभार तसा लोटा. फकस्त गोरेपान ज्यादा दिसायचा. काळजाला व्हता. त्येची आनि माजी दोस्ती त्यामुळं वरचेवर घरात ये जा व्हयाची माजी. खेळात तसी त्येला बक्षीस मिळाल्याली, गाजल्याला खेळाडू. आनि देखणाबी त्यच्यामुळं पोरा-पोरींचा आवडता तसा कुनावर रागावणार न्हाई, पन चवताळला की सगळं इसारला—

दस्खवी नाचाय व्हनार न्हाई येवढी त्येला खा ी व्हती. बरं सांगायचं तर पोरींचं भिरंच्या भिरं त्येच्यावर खूष व्हतं. सदा लुडबुड व्हयाची त्येच्या पाटणं. मी त्येच्याबरबर असलो की त्येच्यासंगट बोलत्याल्या पोरी बगून माज्या बारीक बारीक पोटात चावाय लागायचं–

एक दिसी माज्या कानावर गोष्ट आली. ईस्वासच बसेना त्येच्यावर माजा. आबाला कळलं असतं तर जीव घिऊन रिक्कामा व्हईल ? बरं त्येचा सगळा पराक्रम मान्य हाय. दीडमण तांदळाचं पोतं झटक्यात उचलतोय, हुतुतू चांगला खेळतोय, पळायला कुनाला आवरत न्हाई; दान्या वढतांना सगळ्यास्नी भारा बांधल्यागत धडाडा पाडतोय, म्हंजे काय असूनं करायचं व्हय एखाद्याला—पोरातपोरी मिसळल्याचं हे फळ म्हनायचं ! माजं म्हननं की पुरषाच्या धर्मानं जरा आवरत न्हावं बेतानं.

भरदुपारी पुस्कत आनि पोतं घिऊन वाचायचं निमित काढून वढ्यावर गेलो. खिशात मिठाची पुडी आनि चाकू म्हंजे आंबं खायाची तयारी. प्यल्यांदा भावीत हुड्या टाकल्या. बारक्या पोरास्नी बुडवून जरा दरडावलं, न्हाईतर काय ! दिसभर घरातलो काम चुकवुन आंघूळच करायची जरा बुचकळलं की मुकाट्यानं चड्डया घिऊन पळत्यात–आंघुळ आटपून आंब्याच्या झाडावर हाजरी घेतली आनि पुस्तक घिऊन वाचाय लागलो. गडबडीनं मी खाली बगितलं तर कवापास्नं इऊन फुला आनि म्हादू लागल्यात की रामायनाच्या गप्पा कराया—तवाच फुलाच्या हसन्याला पाल्हजं फुटल्यावानी वाटत मला मारं एकाद्याची हौस वाटली मी झाडावा चिकटून बसलो.

"फुल्ला एक फूल बगितलं स तू ? कसं साजरं फुललंय !" आनि आपुनच जवळ जाईत म्हटला. "अशी लाजतीयास काय ये की जवळ !!" आनि फुलाबी जवळ आली आनि म्हणाली,

"सरनावरची तयारी मग जवळ यायची काय—!" मला धक्काच बसला ! फुला सज्जन म्हणूनच मी आजपानुर बगितल्याली. आगावपना चेट्टामस्करी तिला खात नव्हती आनि आता—? गळ्यात गळा घालून — बसल्यात — वाघीनबी वाघाच्यासमोर गप्पच असती न्हवं—? उमतीत आल्यावर प्यार आनि ढॉर सारखंच ! पन ती दोगं गोड गोड बोलत्यालं बगुनशान रोजच्यासारकं माझ्या पोटात बारीक बारीक चावाय लागलं––

मी ढापा हालिवला आनि खच्चून आराडलो, "म्हऊ उठलय् म्हऊ ऽ !" त्याबरबर पाडाचं आंब धडाडा पडलं. दोघं गडबडीनं उटली आनि वर बगितलं. म्हादूचं डोळं गुंजागत लालभडक…मी तो तिगून गेल्याबिगर उतारनार न्हाई असं ठरवून टाकलं….

मला खूप बरं वाटलं. म्हादू ईषयी बोलत्यात ते कुटल्या कालीजच्या पोरी ईषयी न्हवं तर फुला ईषयीच ह्येची खात्री झाली. एक दिवस तेची तिच्याकड बगायची नदार आजमायला ती त्येच्या घरात गेलो. न्हेमी सारकी हाळी मारली.

"म्हादाऽ…."

"या साब !",

"घरात कशाला यिऊ !"

"मग घरात कस्याला आलास…?"

"म्हंजे अभ्यासाच्या खोलीत…" मी खोलीत गेलो.

"ढेल्या कसा काय फिरलास….?"

"उगीच…"

"आरं बोल की धडाडा…"

"रागाला येशील …ढेलगा फोडाया उटशील !" मी हसलो.

"निदान तुझ्या सारख्या दीसताका ..."

"बरं. रानाला यायचं न्हाई हं ऽ. फुलासारखं फूल काय म्हंतय....?" मी भीत भीत म्हनालो "लोक काय म्हंत्यात म्हाईत हाग....?"

"कोण म्हंतोय त्यो ...." म्हादू गुरकावतच म्हटला, "जरा नावं सांगशील काय मला ..."

"सांगतो की ..."

"कोण त्ये ऽ ?"

"अ ब क ड. असं धरून चल." मी शिस्तात म्हनालो.

"पन समाज काय म्हंतोय म्हाईत हाय .. ? ती कडल्याची आनि ह्यो सुद्ध पाटलाचा घरंदाज. काय भाळलाय त्यां चिचुंद्रीवर शंकरागत !"

"म्हंजे कोन त्यो...." म्हादू तापला खाड्दिशी उटून हुभारला.

"जरा शांत बस. मेहरबानी कर माज्यावर. फुला कोन आप्सरा वाटली तुला....?"

"लायकी न्हाई तिच्या सोभा वा फुडं आप्सरेला..! फुलाचा अपमान हाय त्यो .. !!"

"म्हंजे ?"

"त्या देवांच्या वेशा व्हत्या .. फुला न्हाई .."

"मग कशी हाय ...?"

"ढेल्या तुला थोडक्यात सांगतो, फनसावरी काटे आत गरे गोजिरे गोमटे ! खरं मोती समिंदराच्या तळाला असत्यात हीरं माळावर पडत न्हाईत श्यान पडल्यागत. त्यासाटी खोलवर 'खानीत' जायाला पायजे ! सुरत बामनी आनि डोळं हुलग्यावानी [illegible] बनावट मोती मला नकोय. [illegible] गोमटचा आनि कपाळकरंट्या हजार तर मिळतील हज्जार देऊन येतील' पन फुलासारकी...."

"भावनेंला चिकटून बोलू नकोस...."

"ढेल्या ऽ तुला लेका सुंदर सोज्वळ मन न्हाई.. आधं टाळकं दिऊन तुला धाडलाय वाटतं.."

'खरं तर देखन्या पोरी अधिक चांगल्या वाटल्यात मला. म्हंजे मलाच असंच न्हाई साऱ्या जगालान्— " मी फट्कन बोललो.

"हे बग, जगात न्हाई माजरं कोनी जग हे अळवावरचं पानी !" आनि चडलेला आवाज अधिक चडवत म्हादू मला गदागदा हालवत म्हनाला, 'ढेल्या ! देवान टाळक्यात कांदं बटाटं घालून पाटीवलंय तुला – केवडयाच्या कनसाजवळ साप असत्यात ह्येचं मला वाटत न्हाई पन त्यो सुवास कुच कामाचा न्हाई खीन-भराची गम्मत करून सुख भोगनारं साप हे कनसाला बरं वाटत्यात पन चंदनाच्या खोडाचा बेढब आकार जरी आसला तरी त्याऱ्या गाभ्यात अस्सल सुवास असतोय—!! साप न्हाई की किडा मुंगी!"

मी डोकं खांजळत बसलो. आनि म्हटलं,

"हे तुजं श्यानपन घरातल्यास्नी पटतंय— ? उकिरडयात बसावं पन पगतीला असाव असं म्हननारी ती—"

"त्येला मी जबरदस्त हाय– तितकं श्यानपन आलंय त्यास्नी—"

"म्हंजे सम्मती हाय त्यांची—?"

"मग ?" म्हादू ताट मानेनं म्हटला 'सगळी सम्मती हाय त्येंची आईबाबांनी सांगूनच टाकलंय.

"देव सद्बुद्धी देऊ दे, आनि तडीताम तडीताम लवकर व्हवू दे !" असं म्हनून मी इच्यार करत उटून

आली.

फुलीन्ला म्हादूनं दिस गेल्यात अशी हाकाटी ऽटली. ज्येला त्येला आबाचीच कमाल वाटायची, आनि बायकातर म्हनायच्या 'आबा पाटील म्हंजे गावाला भारी आनि घरात बायकोला आरी ! ह्येचा पोरगा तरी काय ! हल्लीची पोरं शिकल्याली आनि भकल्याली म्हारमांग आता येक व्हनार ! अशानंच पाऊस पडना झालाय ! !

फुलीच्या आईबानं तरी चांगली झडतीच घेटली तिची ! पन ती डगमगली न्हाई. माराला खचली न्हाई लोकांच्या थुकण्याला घाबरली न्हाई. परत जीव द्यायचा ईच्चारपावार करीत बसली न्हाई.

—रात्री दीडचा सुमार असावा. मी आनि दोस्त मंडळी तालुक्याला शिनेमा बगाय गेल्तो ते परत ईत व्हतो, झन्नाटपैकी चर्चा करत. कुनाची तरी एक गाडी धडधडत आली. बैलं जोरात हाकली जात व्हती. जवळ आल्यावर मी आबाचा आवाज वळीकला मी पोरास्नी थांबवून हाळी दिली.

"कोन आबा काय—?"

"व्हय—"

"रातीचं—?"

"फुलाला बरं न्हाई—!" गाडी कासराभर फुडं गेली आनि मी चटाक्‌दिसी पोरास्नी सांगून तालुक्याला गेलो. मनात धुकधु ऽ क व्हईत व्हतं. लगनात झाली मारामारी. डव्हाळ जेवनाचं काय ते परकार, आनि आज लगेच ह्ये काय व्हतंय कायकी. म्हंजे म्हादूला भटानं म्होरूत काय येवस्थीत दिला नसल झालं ! असं बरंच प्रश्न चिटक्यापाखरागत फेर धरून भिरभिरू लागलं.

डाक्तरला जाऊनशान उटिवला. त्येनं फुलाच्या परकूरतीची तपासनी केली. आनि थोडा वेळ थांबून-शान म्हटला.

"आडानी ते आडानीच ! सादी अक्काल न्हाई तुम्हा लोकांना ! यापूर्वीच मेडिकल तपासनी करून घेतला असता तर—" म्हादूनं कपाळावर हात मारून घेतला. मला कायबी समंजना नुस्ता माकडागत बगतच न्हायलो—! ¡

---

## —० म्हणी ०—

१) मंत्री म्हणे उगी राहावे, जे जे देऊ ते ते खावे.
२) अयूबच्या पॅटनला हँड्ग्रेनेडची पूजा.
३) उथळ सभला वक्ते फार
४) तांदूळ राखील तो भात चाखील.
५) रेशनवर रुसली अन् उपाशी बसली.
६) वीतभर केसांना हातभर रिबीन.
७) उतावळा नवरा टेरिलिनला राजी.
८) घरात नाही दाणा आणि म्हणे बरशन आणा.

**कु. प्रतिभा प्र. कुलकर्णी**
पदवीपूर्व साहित्य

# हुंडा पद्धतीच्या निर्मूलनास प्रेमविवाहाची गरज !

शैलज पाटील
द्वितीय वर्ष साहित्य

स्त्री व पुरुष यांच्या जीवनातून निर्माण झालेली हुंडा पद्धती ही आजच्या समाजात केवळ वैवाहिक समस्या नसून अनेक समस्यांचे आश्रयस्थान झालेले आहे. समाजामध्ये स्त्रीपुरुषांच्या परस्पर शारीरिक लैंगिक भावनांच्या तृप्तीसाठी, वंशवृद्धीसाठी सहकार्य, सद्भावना जोपासण्यासाठी व समाजातील कुटुंबसंस्थेचे सातत्य टिकविण्यासाठी ज्या विधीच्या द्वारे स्त्री व पुरुष एकत्र येऊ लागली त्या विधीस विवाह ही संज्ञा रूढ अर्थाने प्राप्त झाला. आज जगातील सर्व राष्ट्रामध्ये विवाह ही प्रथा वेगवेगळ्या अर्थाने वापरली जाते. भारतामध्ये विवाह ही प्रथा संस्कार मानण्यात येते. भारतामध्ये मग आज रूढ असलेल्या हुंडा घेणे-देणे या प्रथेस काय मानाव? आर्थिक अडचणींना तोंड देण्याचे सामर्थ्य यावे म्हणून लोकांच्यात गट करून राहण्याची प्रवृत्ती वाढली; व यातूनच कुटुंबसंस्था उदयास आली. कुटुंबसंस्थेचे सातत्य टिकविण्यासाठी विवाह या प्रथेस चालना मिळाली असेल तर मग विवाह म्हणजे काय हे पाहणे अत्यंत आवश्यक आहे. विवाहाची व्याख्या ज्या, त्या समाजात वैवाहिक प्रथा व रूढी यावर बऱ्याच प्रमाणात आधारलेली असते. भारतीय समाजात पूर्व हिंदूधर्मशास्त्रकारानी 'धर्माचरणासाठी स्त्री व पुरुष यांनी एकमेकांचा पती, पत्नी या नात्याने केलेला अंगीकार म्हणजे विवाह होय ! अशी केलेली व्याख्या आजही रूढ मानण्यात येते. पण सर्वसाधारण विवाहाची व्याख्या पुढील प्रमाणेही करता येईल 'दोन भिन्न कुटुंबसंस्थेतील भिन्न लिंगी व्यक्तींत निर्माण होणारे पारस्परिक संबंध होत !

भारतीय समाजाच्या दृष्टीतून विवाह या प्रथेचा विचार करीत असता, या प्रथेचे ऐतिहासिक स्वरुप व आधुनिक स्वरुप यांचा विचार करता बराचसा फरक सापडतो भारतीय समाजात पाश्चिमात्य राष्ट्रांचे अनुकरण करून विवाह हा एक करार आहे असे मानण्याचा प्रयत्न प्रभावी होत आहे. पण कराराच्या माध्यमातून जरी विवाह झाले तरी सुद्धा विवाहानंतर पती पत्नी कराराचे प्रतिनिधी या नात्याने न राहता समाजात रूढ असणाऱ्या कुटुंबपद्धतीच्या स्थिर रचनेनुरुप-कुटुंबाचे घटक म्हणून समाजात वावरू लागतात तेव्हा विवाह हा करार आहे ही भावना त्यांची राहिलेली नसते. ते संस्कार याच स्वरूपातून समाजात

वावरत असतात. वृद्धांचे, नातेवाईकांचे, मुलांचे-संगोपन करणे इत्यादी गोष्टी करतात. परंतु आधुनिक काळात अनेक समस्यांमुळे कुटुंबाची स्थिरता बिघडताना दिसते आहे. कुटुंबसंस्थेची कार्ये अनेक सामाजिक संस्थेच्या रचनेमुळे लोप पावत आहेत. व त्यामुळे पती-पत्नी यांच्यातील स्थान, दर्जा यात बदल होऊन सहकार्य व सद्भावना यावर आधारलेली कुटुंबसंस्थेची रचना बदलत आहे. आज कुटुंबामध्ये कुटुंबसंस्थेच्या मूलभूत कल्पनेपेक्षा पती-पत्नी यांच्या कार्यावर व दर्जावर त्यांचे महत्व ठरवले जाते आहे. भारतीय विवाहाच्या जुन्या कल्पनेला आपण संस्कार मानतो या संस्कारामध्ये अनेक गोष्टींना पावित्र्याचे स्थान प्राप्त झालेले असते. पूर्वसमाजामध्ये स्त्रियांना वैवाहिक स्वातंत्र्य होते, त्यांना स्वतःच्या आवड, इच्छेनुसार आपला पती-साथी-जोडीदार निवडण्याचा अधिकार होता. म्हणजेच त्याला 'स्वयंवर' म्हणून ओळखले जात होते परंतु तत्कालीन [illegible]जाच्या शेवटी वैवाहिक संबंध लवचिक झाले, व स्त्रियांना दुय्यम दर्जाचे स्थान प्राप्त झाले. याच प्रमाणे वैवाहिक जीवनांत पावित्र्य व भागिदारीची कल्पना राहिली नाही. इतकेच नव्हे आज स्वतंत्र युगात तरी विवाहाच्या नियुक्तीत मुलीला कोठे फारसा वाव मिळतो का? आजही आपण वधू परीक्षापद्धतीत रममाण होतो. व केवढीही शिकलेला, चांगली वधू असली तरी तिला परीक्षाही द्यावीच लागते. मात्र वरपक्षास हे काही नाही. तेव्हा परस्परांच्या सद्भावना, सहकार्य एकवटत असताना एकास परीक्षा व एकास परीक्षा नाही असा फरक का मानावा? आजही एकीकडे जातिनिर्मूलन करत असता, जाती-जातीत विवाह करण्याची पद्धती आढळते. या पद्धतीत वर व वधू यांच्या घरातील नातेवाईकांच्या इच्छेनुसार व जुळत्या पत्रिकेनुसार मुलीला विवाह करावा लागतो. म्हणजेच आजच्या स्त्रियांना विवाहा विषयक जितके स्वातंत्र्य हवे तितके भोगता येते का? याला कारण समाजरचनेवर आधारित असलेली विवाह पद्धती होय! मात्र केवळ समाजरचनाच आधारित नाही तर स्त्रियांचा सामाजिक दर्जा, शिक्षण, सामाजिक स्वातंत्र्य व वाढत्या विवाह समस्या. वाढत्या प्रगत समाजा बरोबर विवाह समस्या वाढत आहेत. एकीकडे समाजामध्ये स्त्रियांच्या शैक्षणिक स्वातंत्र्यामुळे स्त्रियांचा शैक्षणिक दर्जा वाढत आहे व त्यामुळे दुसऱ्या बाजूस शैक्षणिक दर्जामुळे वैवाहिक जीवनात स्थान बदलत आहे. याचबरोबर सुशिक्षित समाजाच्या विवाहा विषयीच्या कल्पना बदलत आहेत. पूर्वसमाजामध्ये विवाहात वरमूल्य व वधुमूल्य ही समान कल्पना होती ही लोपपावून फक्त वरमूल्य ही कल्पना आजच्या प्रगत समाजात जोपासली जात आहे. पूर्व समाजात उभय पक्षाकडून भेटी देण्याची प्रथा होती. येवढेच काही समाजात वधूस भेट म्हणून दिल्या जाणाऱ्या वस्तू या तिच्या भावी जीवनास उपयुक्त पडाव्यात म्हणून दिल्या जात असत व त्यातून साहजिकच वधू विषयी असणारे प्रेम व्यक्त होई. आदिवासी समाजात हुंडा ही पद्धत अस्तित्वात नव्हतीच पण कुटुंब स्वतंत्र होऊन खाजगी मालमत्तेची प्रवृत्ती निर्माण झाली व आर्थिक सहकार्य ही भावना वाढली तेव्हा ती कल्पना अस्तित्वात आली.

हुंडा ही पद्धत आपणास ग्रीक व रोमन समाजात अस्तित्वात असलेली सापडते. रोमन कायद्यात या प्रथेबाबत पुढील उल्लेख सापडतो. पती निधनानंतर विधवेस हुंडा परत द्यावा! हाच उल्लेख बायबलमध्ये सापडतो. जेम्स किंग 'हुंडा' या शब्दास कन्यामूल्य समजतात. यु. एस. व यु. के. मध्ये 'डॉवरी' म्हणून ओळखतात. तर मुसलमान-समाजात प्रो. सिद्दीकी म्हणतात. विवाहानंतर पत्नीचे आर्थिक स्थान सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने पत्नीला योग्य रक्कम द्यावी असा इस्लाम धर्माने कायदाच केला आहे. मात्र ही रक्कम उभय पक्षाच्या करारावर आधारित असते.

आज भारतात हुंडा पद्धतीने राक्षसी रूप धारण केलेले आहे. ही प्रथा केवळ हिंदुसमाजांत अस्तित्वात नाही तर ख्रिश्चन व सिंधी समाजात सुद्धा अस्तित्वांत आहे. सामान्य लोकांना जातीय भावनेमुळे वर व वधू पसंतीचे क्षेत्र मर्यादित असते. स्वतंत्र भारताच्या राज्य घटनेने १९५६ साली स्त्रियांना वारसा-हक्काची प्राप्ती करून दिली आणि यामुळे हुंडा पद्धती प्रभावी झाली. विवाहामध्ये वधुपक्षाकडून वर पक्ष

जितकी हुंड्यांची रक्कम अधिक घेई तितकी त्याची समाजात प्रतिष्ठ ठरली जाते. इतकेच नव्हे तर जितका हुद्देदार व शिकलेला तितका हुंडा अधिक व जितकी वधू कमी आकर्षक तितका हुंडा जास्त. या वाढत्या-सामाजिक प्रतिष्ठेला हुंडा हे कारण ठरून आज भारतीय समाजात अनेक वृद्ध कुमारिकांचा प्रश्न समाजासमोर 'आ' वासून उभा आहे. वारसा हक्काच्या प्राप्तीतून हुंडा पद्धतीत प्रभावी चालना मिळाली. कुटुंबामध्ये असणाऱ्या सभासद संख्येवर संपत्तीचे वाटे होऊ लागले व मुलीच्या वाटचास येणारी संपत्ती ही तिने हुंड्याच्या स्वरूपात देण्यास सुरुवात झाली.

परतु वरपक्ष हा तिच्या कुटुंबाची अर्थरचना व तिच्या वाटचास येणारी संपत्ती याचा विचार न करता स्वत:चा दर्जा, शिक्षण व आवड यांची सांगड घालून मुलीकडे हुंडा मागू लागला व ती मागणी वधूपक्ष पेलू न शकल्याने हुंडा ही एक समस्या झाली व ती या समस्येतून कौटुंबिक स्थिरता, कुटुंब दर्जा नष्ट झाला व समाजात मुलीचा विवाह हे एक संकट भासू लागले. हुंड्या अभावी लग्न जमेना म्हणून शिक्षणास प्राधान्य पण एकीकडून हुंडा रक्कम वाढू लागली. म्हणून शिक्षण दर्जा वाढला व शिक्षण घेत राहिल्याने वय वाढले व वाढत्या वयाने सौंदर्य लोपले व त्यामुळे सामाजिक व मानसिक धारणा शक्ती बिघडली, आणि एका बाजूस शारिरीक भावना अतृप्त राहिल्या व त्यामुळे समाजात कुमारी मातांचे, गर्भपाताचे प्रमाण वाढले. आणि भारतीय समाजात स्त्रियांचा पारंपारिक दर्जा कनिष्ठ असल्याने वारसा हक्कानुरुप निर्माण झालेला मालमत्तेचा हक्क मागण्या इतके स्वातंत्र्य राहिले नाही. मात्र सुशिक्षित समाजात स्त्रियांचा दर्जा वाढला. शिक्षण प्रसाराने ती शिक्षण घेऊन अर्थ प्राप्ती करु लागली व त्यामुळे वरा विषयीच्या तिच्याही कल्पना साहजिकच वाढल्या, ती स्वत:च्या दर्जास योग्य असा पती शोधू लागली आणि यामुळे वधू बापाच्या अपेक्षाही सुखकर जीवनाच्या वाढल्या आणि त्यामुळे विवाह जमेनात. जर जमलेच तर हुंड्यामुळे मोडू लागले. यामुळे स्त्री जोरात शिक्षण घेऊ लागली व स्वत:च्या पायावर उभे राहून जीवन कंठू लागली. पण अपेक्षा हा बदलत राहिल्या.

सिंधी समाजात जातीतच विवाह करण्याची पद्धत रूढ आहे. या समाजात विवाह हे दलालीच्या स्वरुपात जमवले जातात. यामुळे विवाह जमविण्याचे हुंडा हे एक प्रभावी साधन मानण्याची कल्पना दिवसें-दिवस वाढत आहे. कमीत कमी २००० रुपयापासून पुढे ही रक्कम किती वाढेल हे मात्र सांगता येत नाही.

पाश्चात्य समाजात पुरुषापेक्षा स्त्रियांची संख्या अधिक असल्यामुळे तेथे कुमारिका जास्त असण्याचे कारण असावे. पण अखिल भारतासंबंधाने तसे म्हणता येणार नाही आणि महाराष्ट्राच्या बाबतीत तशी शक्यताच नाही. केरळ राज्याची मात्र उलटी परिस्थिती आहे. तेथे दर हजारी पुरुषामागे बावीस स्त्रिया जास्त आहेत. त्या स्त्रियांची अधिक देशांतर्गत स्थलांतर लक्षात घेता परिचारिकेचा व्यवसाय करणाऱ्या अनेक केरळीयन स्त्रिया आपणास आढळतात. पण खोलवर विचार करता असे आढळते. त्या स्त्रिया व्यवसायासाठी देशात सर्वत्र येतात. त्याला कारण एकच आणि ते म्हणजे वाढत्या हुंड्याचा प्रश्न. त्यांना जातीत विवाह करावे लागतात. व त्यामुळे हुंड्यांची मागणी पूर्ण लागते व ती पूर्ण करण्यासाठी वडिलांजवळ भरपूर पैसा नसल्याने त्यांना इतरत्र व्यवसाय-नोकऱ्या करून पैसा कमवावा लागतो व हुंड्याची समस्या सोडवावी लागते. फक्त पैसा एवढी समस्या सोडवून विवाह होत नाही. तर काही प्रमाणात दागिने सोने द्यावे लागते. म्हणजे सोने आणि पैसा दोहोंचा समन्वय करून दिली जाणारी देणगी म्हणजे हुंडा समजला जातो. मग आर्थिक विपन्नतेत भरडल्या जाणाऱ्या समाजाला हे योग्य आहे का? पेलणारे आहे का? १९६१ साली हुंडा पद्धती बंद कायदा झाला त्याची अम्मल बजावणी होते का?

स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेने १९५६ साली वारसा हक्क देऊन हा हुंडा प्रतिबंधक कायदा का केला? तर वारसा हक्कातून हुंडा पद्धती प्रभावी झाली व हुंडा घेण्याच्या प्रवृत्तीत बदल झाला. प्रतिष्ठा संपादन करण्यासाठी हुंडा घेणे, वराच्या शिक्षणक्रमास जो पैसा

लागला, खर्च लागला तो हुंड्याच्या स्वरूपात वधुपक्षाकडून घेणे. बहिणीच्या विवाहासाठी दिलेली हुंडा रक्कम भरून काढणे, आर्थिक प्राप्तीत भर टाकणे इत्यादी सारख्या विकृत कल्पना हुंड्यास जोडण्यात येऊ लागल्या तेव्हा हुंडा ही समस्या निर्माण झाली व कायदा करावा लागला. जर वराचा शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी लागलेला–बहिणीला दिलेली हुंडा रक्कम भरून काढण्यासाठी वधुकडून हुंड्याच्या स्वरूपात रक्कम घेतली जाणे हे योग्य असेल तर मुलाचे संगोपन करण्याची तयारी नसताना त्याला जन्म देणे हे पित्याचे वागणे योग्य आहे का ?

भारतामध्ये दिवसें–दिवस वाढत असलेली हुंडापद्धती ही समस्या नष्ट करावयाची असेल तर आधुनिक पद्धतीने जुळणाऱ्या विवाहास मान्यता द्यावी लागेल. बदलत्या समाजाबरोबर वधू–वरांच्या निवडीच्या पद्धतीतही बदल होत आहेत समाजात नव्या नोकऱ्या–शिक्षण–कोर्ट-कचेऱ्या, प्रवासाची साधने–राहणीमान यामुळे स्त्री–पुरुषांचे संबंध जवळ येत चाललेत. ज्या व्यक्तीशी पुरुषाशी स्त्रीचा परिचय अधिक येवू लागला. स्वत:च्या स्वभावाशी मिळणाऱ्या स्वभावाच्या व्यक्तीशी स्त्री विवाह करू लागली व या पद्धतीतून अनेक व्यक्तींच्या आवडी - निवडीवर आधारलेले विवाह दोघांच्या आवडी–निवडीतून होऊ लागले तर हुंडा हा अस्तित्वात राहणार नाही आणि विवाहास जातीची बंधनेही पडणार नाहीत. म्हणजेच प्रेमविवाह हाच हुंडा पद्धतीच्या निर्मूलनाचा एक मार्ग आहे. विवाह करताना कुटुंबाची (नातेवाईक) व समाज यांची पर्वा न करता हुंडा न घेण्याची प्रवृत्ती स्त्री–पुरुषात येत नाही. तोपर्यंत "हुंडा पद्धती अस्तित्वात राहणारच!" आणि समाजाची वाढत्या प्रगतीबरोबर स्त्री–पुरुष जीवन अध:पतनाची पातळीही वाढणार म्हणून समाज-प्रतिष्ठा दर्जा, जातीची बंधने, हुंडा याना झुगारुन देऊन परस्परांच्या समान स्वभाव भावनेतून, भविष्याचा खंबीर विचार करून एकत्र सद्भावना, सहकार, औदार्य दाखवून जीवन कंठण्यास प्रवृत्त होणाऱ्या स्त्री–पुरुषास समाजाने विवाहास मान्यता द्यावी म्हणजेच प्रेमिकांनी प्रेमविवाह हा करार न मानता संस्कार मानून प्रेमविवाह करावा. आणि हा समाजमान्य ठरावा !

---

सुखाच्या तिजोरीची किल्ली म्हणजे संपत्ती. पण या संपत्तीच्या मागे लोभी माणूस लागला म्हणजे शेवटी संपत्ती हे सुखाचे साधन आहे, हे विसरुन जाऊन संपत्तीचा संचय करणे हेच अंतिम सुख होय, अशा मिथ्या ग्रहाच्या भवऱ्यात तो सापडतो प्रसन्न होईपर्यंत ज्या संपत्तीची तो हाडाची काडे करून व्यभिचारी निष्ठेने तो उपासना करीत असतो तीच एकदा प्रसन्न झाली की तिच्या प्रसन्न वातावरणात आनंदाचा आस्वाद घेण्याचा विसर पडून त्याने तिला कडी–कुलुपात कोंडून टाकावे हा देखावा विचित्र नाही का?

**आबासाहेब बाबूराव स्वामी**
प्रथम वर्ष वाणिज्य

# ब ट वा

**विजय कमते**
प्रथम वर्ष साहित्य

बाहेर पावसाची रिपरिप चालू होती. हादग्या पावसानं पाठ सोडली नव्हती. गेले दोन तीन दिवस पावसाची उघडझाप चालूच होती. लोकांना कामधंदा सुचत नव्हता. आता तरी पावसाने निराळेच वर्तन दाखविले होते. सकाळी आठपासून तो सारखा पडत होता. सहा वाजले तरी तो थांबण्याची चिन्हे दिसेनात.

लोकांना पावसाचा कंटाळा आला होता तरी सदू पवाराच्या दोन शेंबड्या पोरांच्या मात्र यामुळे आनंदाला उधाण आले होते उंबऱ्यावर बसून ही दोन पोरे पावसाची मजा बघत होती. त्या दोघांचे कपडे भिजले होते. मधीच पावसात जाऊन नाचायची, नाचायची त्यांच्या केसातून पाणी गळत होते.

"आत यारं पोरानू ! पावसात भिजू नका कसारीनं पडला तर कुटलं पैसे आनू ?" काळजीच्या स्वरात गिरीजा ओरडली. पण पोरांनी कांही ऐकलं न्हाई.

मधल्या सोप्यात गिरीजा बसली होती. उद्याच्या पोटाची तिला काळजी लागली होती. दसऱ्याचा सण तोंडावर आला होता. हातात पैसे नव्हते. होते नव्हते ते किडुकमिडुक संपले होते. उद्या काय खावे याची तिला भ्रांत होती तिच्या डोक्यात विचारांनी धुमाकूळ मांडलेला होता. बाहेर पावसाचा धुमाकूळ व डोक्यात विचारांचा धुमाकूळ यामुळे ती त्रस्त झाली होती.

सदू पवार हा गावातला गरीब माणूस होता गिरीजा ही त्याची बायको दोघेही कामाला जायचे. त्यावरच त्यांचा उदरनिर्वाह चालत असे. शिवाय त्यांनी एक म्हैसही पाळली होती सकाळी लवकर उठून म्हैशीला वैरण आणून तो कामाला जात असे. म्हैशी-वर त्यांचा भारी जीव होता उपाशी पडलो तरीही म्हैस विकायची नाही, असे त्यांनी ठरविले होते.

पाऊस एकसारखा असल्यामुळे त्यांना कामधंदा नव्हता हातात पैसे नव्हते आणि यामुळेच त्यांना उद्याच्या पोटाची काळजी लागली होती देवाने पोट दिले नसते तर बरे झाले असते असे त्यांना वाटत होते. पाटलाकडे तरी कांही पैसे उसने मिळतात का पाहू या आशेने तो तिकडे गेला होता.

दिवे लागण झाली. गिरीजा तशीच बसली होती. ती दोन्ही मुले आपल्या आईजवळ बसली होती. इतक्यात बाहेरुन सदू आला पावसाने भिजलेले पोते खुंटीवर ठेवले. तिथलीच एक घोंगडी पसरुन त्यावर तो

बसला. आणि चिलीम पेटविली.

मावळतीच्या अंगाची पाल चुकचुकली. गिरीजा बाहेर आली आणि म्हणाली, 'पाटलानं काय दिलं काय जी ?''

तोंडातली चिलीम बाहेर न काढता त्यानं मानेनेच नकार दर्शविला.

मग ! – तिनं विचारलं.

काय ?

''उद्या जुंदळं आणाय पाहीजे. उद्या बाजार हाय पोरान्नी कापडं बी न्हाईत मग काय करायचं? आम्ही कसबी दिस काढू; पर त्या पोराचं काय करायचं ?'' पैशाची अडचण असून सुद्धा तिनं आपल्या समस्या मांडल्या.

सदू गप्पच बसला. गिरीजा एवढं बोलून गप्पच राहिली. सदू विचार करु लागला तेथे निरवनिरवीची शांतता पसरली. म्हैशीच्या हंबरण्यानं शांततेचा भंग झाला आणि त्याबरोबर सदूला एक युक्ती सुचली.

असं करायचं.

काय ? गिरीजानं विचारलं.

''म्हशीलाचं इकाव म्हनतो. मा शे रुपये येतील. त्यात एक जुंदळ्याच पोतं, तुज लुगडं, मला एक धोतर, पोरान्नी कापडं आणाय येतील.'' क्षणार्धात त्यानं आपला बेत ओकून टाकला

''म्हम !'' क्षणभर गिरीजेच्या डोळ्यापुढे काजवे चमकले. ह्या बेतानं तिच्या अंगावर काटे आले म्हैस विकायची न्हाई असं तिनं ठरविलं हात. ती विचार करु लागली. अखेरचा उपाय तोच होता.

''मग काय म्हणनं हाय तुझं.'' सदूनं विचारलं.

''हूं !'' तिनं दीर्घ नि:श्वास सोडला.

म्हैस विकायचा बेत पक्का झाला- म्हैस कशी विकावी ? या अस्वस्थ विचारानेच ते झोपी गेले.

सकाळी सदू लवकरच उठला. पाऊसही थांबलाच होता त्यानं म्हशीला धुऊन आणलं, धा पैशाचं तिला येशाल लावत. गिरीजेने एक चतकोर भाकरी म्हैशीच्या तोंडात दिली. आणि सदू गडहिंग्लजच्या दिशेनं निघाला....

उन डोक्यावर आलं तरीबी सदूच्या म्हैशीला गिन्हाईक येईना. नशीबाला दोष देत तो बसला होता. तेवढ्यात त्याच्या वळखीच्या एका दलालानं एक गिन्हाईक आणल. हिकडं-तिकडं होऊन सहाशेला सौदा ठरला, शंभराच्या पाच नोटा आणि दहा-दहाच्या दहा नोटा मोजून घेऊन सदबानं त्या चंचीत (बटव्यात) ठेवल्या.

''तंबाकू घाला की गा पाहुण्यांनो.'' असं म्हणून सदू खाली बसला पैशाची चंची त्यानी पायाच्या आंगठ्याखाली ठेवली. पाहुणेही बसले. सर्वांनी चिलीम ओढली. ते चालते झाले. म्हैशीला चांगले गिन्हाईक मिळाले, आणि आपला दसरा चांगला होणार या आनंदाच्या भरात सदू होता. तोही तसाच उठला; आणि मांडेकरांच्या धान्य दुकानावर गेला.

'काय पाहिजे हो.'' तेथील नोकराने विचारले.

''जुंधळ्याच्या पोत्याचं दर काय ?''

''एकशेहे पंचाव्वन रुपये'' नोकरानं दर सांगितला. गिन्हाईक चांगले आहे असे समजून त्याने टोपी सरसावली.

''मग, एका पोत्याची पावती फाडा तर.'' सदबानं ऑर्डर सोडली. तेथील कारकुनाने एका पोत्याची पावती केली.

पैसे देण्यासाठी सदूनं खिशात हात घातला... खिसा रिकामा होता. समदी दुनिया आपल्याभोवती फिरतीया असं त्याला वाटू लागलं. डोळघाला चक्कर आली त्याला घाम फुटला. आणि तेथेच तो धाडकन कोसळला. कोणाला काही समजेना. इतक्यात तेथे लोक गोळा झाले. त्यांनी त्याच्या तोंडात पाणी घातले. काही त्याला वारा घालू लागले.

थोडया वेळाने तो शुद्धीवर आला. दैवी संचार झाल्याप्रमाणे तो एकदम उठला आणि जनावरांच्या बाजाराच्या दिशेने पळत सुटला. लोक बघतच राहिले. त्यांनाही काही समजेना.

आणि इकडे आपला नवरा केव्हा येतो याची गिरीजा चातकाप्रमाणे वाट पहात होती. आणि पुन्हा एकदा मावळतीच्या अंगाची पाल चुकचुकली.

---

## ....० गोड सात अमृतकणांची मालिका ०....

★ १) सत्याची तमा बाळगणारे भेकड नको, मानवी स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेकरीता गोळ्या झेलण्याची त्यांची तयारी हवी....तुमची आहे काय ?

□ २) अस्पृश्यता निवारण करणे हे सवर्ण हिंदूंच्या दृष्टीने प्रायश्चित घेणेच होय. हिंदू–धर्माच्या दृष्टीनेही ते त्यांचे कर्तव्यच ठरते. त्यायोगे शुद्धी व्हावयाची ती 'अस्पृश्यां' ची नव्हे, तर तथाकथित उच्चवर्णियांची. खास 'अस्पृश्यां' चा असा कोणता दुर्गुण नाही. घाणेरडेपणा, आरोग्यहीनता हेही नाहीत.

卐 ३) "मी स्त्रीच्या जन्माला आलो असतो तर" स्त्री ही आमच्या हातचे खेळणे बनण्याकरीता जन्माला आली आहे." या पुरुषी आढ्यतेविरुद्ध बंड पुकारले असते. स्त्रीच्या हृदयात सहज प्रवेश मिळावा म्हणून मी मनाने स्त्रीच बनलो आहे."

✻ ४) मी एक साधा माणूस आहे. साधे जीवन जगण्यातच मला आनंद आहे."

◆ ५) "अर्थशास्त्राच्या नियमावरील कैक आधुनिक पाठ्य–पुस्तकांपेक्षा जगातील धर्म–ग्रंथ हेच अर्थशास्त्राचे अधिक विश्वासार्ह व भरीव ग्रंथ आहेत. असेही माझ्या मनात येते.

❀ ६) सौंदर्य ही आंतरिक वस्तू असल्याने त्याचे दर्शन होणे शक्य नाही.

❋ ७) जीवन हे खरोखर वाचण्यालायक पुस्तक होय.

**–महात्मा गांधी**

संग्राहक–एम. आर. देवरकर
पदवीपूर्व साहित्य

# तरुणांना आवाहन

**बी. एस. सावंत**
पदवीपूर्व साहित्य

सर्व प्राण्यामध्ये मानव प्राणी सर्वात श्रेष्ठ मानला जातो व आहेच तो सर्वांच्यापेक्षा बुद्धीमान आहे. त्याने अनेक शोध लावून मानवाची प्रगती करून घेतली. हे सर्व करत असताना इथेच आहे पण दिसत नाही. याप्रमाणे वाटचाल करत आहे. अशी वाटचाल काय उपयोगाची आहे ? माणसा-माणसामध्ये भेद मानून-श्रेष्ठ, कनिष्ठ मानून प्रगती करून काय उपयोग आहे. मानव आपल्या आपल्यात भेद मानतो,

माणसामध्ये वाईट गुण म्हणजे जातीवाद हा हरिजन, हा ब्राम्हण, हा क्षत्रिय, हा मुसलमान हे भेद मानले जातात सर्वच जातींना एकाच प्रकारे जगता आले पाहिजे. मानवा मानवामध्ये काय फरक आहे ?

हरीजनांना आपण तुच्छ मानतो विचार करा, परमेश्वराने एका जीवाला जन्माला घातले. ते काही भेद करुन नाही. तर आपण भेद पाडले. एकाला जन्म हरिजनामध्ये होतो आहे व एकाचा जन्म ब्राम्हणाच्या घरी होतो असे आम्ही म्हणतो. खरे पाहिले जर जन्म मानवात झाला. कोणत्या कारणासाठी आपण भेद मानतो ? परमेश्वराने सर्वांना सारखा जन्म दिला असताना आपण श्रेष्ठ व तो कनिष्ठ का मानावयाचे ? तो हरिजन म्हणून आपण त्याला राहण्यास गावाबाहेर, जेवण्यास बाजूला, उभे राहताना तो बाजूला किती नीच प्रवृत्ती आहे. माणसासारखा माणूस असताना एकाला स्वैराचाराप्रमाणे वागता येतं व दुसऱ्याला दुसऱ्याच्या बंधनात वागविलं जातं. असं आतापर्यंत समाजात चालत आलं आहे. आणि आजचे तरुण हे पाहून सुद्धा आंधळ्यासारखे वागत आहेत ! धिक्कार असो या तरुणांचा ! काय उपयोग आहे तुमचा या जगात अशा स्थितीत तरुणांनी झटून हा भेद नष्ट करावयास पाहिजे.

असे न करता आजचा तरुण वागतो आहे. कसतरी जगतो आहे. एकदिवस मरुन जातो आहे. पूर्वीच्या परंपरेला अनसरुन वागतो. पूर्वीच्या भोळ्या नीच प्रवृतीच्या लोकानी असा भेद करून टाकला की सारं जग अमृतासारखे, विषासारखं करुन टाकले अशा वीषरुपी जगात जगताना मानवाला लाज वाटावयास पाहिजे की आज माझ्याच बांधवाना मी असा भेद करुन चालेल काय हरिजनांना पाणी सुद्धा सरळ पिता येत नाही. उन्हाळा सुरु असताना पाण्याचा तुटवडा पडतो त्यावेळी इतर समाज विहिरीवर वाटेल तशा प्रकारे पाणी उपसतो आहे. व हरिजन त्याच ठिकाणी मागत असताना पाणी त्यांना मिळत नाही. दोन तास उभा राहून एक घागर पाणी मिळते आहे व तेवढ्यावरच जीवन जगवावे लागते आहे. अशा

दिवसात त्याना दोन महिने आंघोळ करता येत नाही. पाणी मिळत नाही. एका समाजाकडून दुसऱ्या समाजाला मिळत नाही. दिलं जात नाही. त्यावेळी हात असून पाय असून पांगळ्या सारखे, तोंड असून मुक्या सारखे, कान असून बहिऱ्यासारखे राहावे लागते का ? इतका भेद का ? जो समाज पाणी भरतो तो काय सोन्याचा आहे ? व ज्याना भरण्याची परवानगी दिली जात नाही तो काय चिखलाचा आहे ? सर्वजण सारखेच. मग असे का ?

एक सुंदर हुशार मुलगा असून देखील यामुळे त्याची अधोगती होतो आहे त्याला खूप इच्छा असतात पण त्या विरघळून जातात. त्याच्या मनात वाईट मार्ग सुचू लागतो. व मग तो कसंतरी जीवन जगतो. तोही असाच जगतो व आजचा तरुण असाच जगतो की ? "जगतो का तर मरण येत नाही म्हणून व मरत का नाहीस तर जगणं चालू आहे म्हणून."

अशावेळी सर्व तरुणांनी पुढे येणे आवश्यक आहे. असा भेद नष्ट करून टाकला पाहिजे. मला प्रसंग आठवतो. मी दररोज विहीरीवर पाणी आणण्यास जात होतो. त्याच वेळी बऱ्याचश्या लिंगायत समाजाच्या स्त्रिया पाणी भरण्यास येत असत. विहिरीला साखळी असलेला 'रहाट' एकच. त्यामुळे पाळी लागायची व घागरींची गर्दी व्हायची मग त्यावेळी लिंगायत बाई एकदा मला म्हणाली की, "माझ्या घागरीला शिवू नकोस ते पाणी आम्हास चालत नाही. देवपूजा करावयाची आहे. बाजूला उभा रहा" मी मुळातच अशा विषयी पेटलेला. मग आगीत तेल ओतलं की जसं भडकतं त्याप्रमाणे मी भडकलो व म्हणालो, "माझी सुद्धा घागर शिवण्याची तुमची लायकी नाही. तुम्ही शिवलेलं पाणी आम्ही पीत नाही तुम्ही सुद्धा लांब उभ्या राहा." अशा प्रत्येक ठिकाणी व वेळी मी अशा समाजाबरोबर भांडत असतो.

आजचे सरकार सुद्धा जाहीर करते की, जातीभेद नष्ट करा व त्याच वेळी सांगते की, "हरिजनासाठी जागा राखीव राहतील." त्यांना अनेक सोयी उपलब्ध राहतील. म्हणजे सरकारसुद्धा अजून स्वतः जातीभेद करते आहे व जनतेस मात्र नष्ट करा असे सांगत आहे. हरिजनासाठी सवलत अशी जाहिराती काढते. खरोखर त्यामुळे भेद निर्माण होतो. अतिशय चुकीचीही विधाने केली जातात. अशा योजना आखण्यापेक्षा जे आर्थिक परिस्थितीने गांजलेले आहेत. अशानाच मदत सरकारने करावयास हवी हरिजनामधील बरेच लोक अती श्रीमंत आहेत. मात्र इतर समाजामध्ये मात्र बरेच लोक गरीब आहे. एकवेळ सुद्धा जेवण मिळत नाही. काम मात्र खूप करावं लागतं. पण त्याला मोबदला मिळत नाही. सरकार अनेक योजना पार पाडत. शेतकऱ्यांना कर्ज वाटत पण हे कर्ज ज्याचं शेत आहे. घर आहे त्यानांच मिळू शकते. व ज्याचं घर, शेत नाही त्याना मात्र त्याचा काहीच उपयोग होत नाही मग सरकारच्या योजनेचा काय उपयोग आहे ? श्रीमंताना कर्ज मिळते तेच श्रीमंत होतात व गरीबाना मात्र त्याचा अजिबात फायदा होत नाही. मदत (शिक्षणात) सुद्धा श्रीमंताना सूट मिळते गरीबांना नाही. हरिजनात सुद्धा बरेच श्रीमंत आहेत त्याना शिक्षणात सरकार पैसा देते, सवलती देते पण गरीबाला थोडीच मदत करते. असे सरकारने करु नये. सर्व समाज हा एक आहे. असे मानून जे आर्थिक परिस्थितीने गांजलेले आहेत अशानाच मदत करून सर्व समाज सुधारावयास पाहिजे. हीच आजची गरज आहे. यासाठी आजच्या तरुणाने पुढे येऊन झगडले पाहिजे. भेदभाव नष्ट करावयास पाहिजे. तरच तरुणाचे जगणे सार्थकी लागेल. नाहीतर हा समाज असाच चालू राहील एकवेळ क्रांती होईल व मग समाजाचे डोळे उघडतील की आपण चुकतो आहे. आपला मार्ग बदललेला आहे. हा दुरुस्त करावयाचा आहे. हे करत असताना मा. फुले, भाऊराव पाटील, क. वि. रा. शिंदे यांचे आदर्श ठेवले पाहिजेत. ह्या माणसांनी जिवाचे रान केले. की हा समाज पुढे यावा म्हणून तो थोड्या प्रमाणात झाला त्याचे अजून मूळ शिल्लक आहे. अशा माणसाकडे जगाने दुर्लक्ष केले. जग म्हणेल ते म्हणून घेतले पण आपल घरदार त्यानी खुलं केलं. त्याचप्रमाणे आजच्या तरुणांनी प्रथम आचरणात आणूनच मग पटवून दिल पाहिजे.

पण अशाप्रकारे तरुण करतो आहे काय ? नाही असे अनेक प्रथा पाहून सुद्धा न पाहिल्यासारखे केले जाते. रस्त्यात असे प्रसंग पाहून सुद्धा तिकडे दुर्लक्ष केले जाते. आजचे तरुण इतर गोष्टीकडे न सांगता लक्ष देतात. सप करतात, गावातून भटकतात, दुसऱ्याची चेष्टा करतात. आणि निरनिराळ्या प्रकारचे ड्रेस करून स्वतःला मोठे समजतात. पण नाही. यात त्यांचा मोठेपणा नाही. मोठेपणा मागून मिळत नसतो. तर तो दुसऱ्याकडून दिला जातो. अशा या मोठेपणाचा काय उपयोग आहे ? हा मोठेपणा नसून नीचपणा आहे. दुसऱ्याचा जीव जात असताना आपण मजत राहण्यापेक्षा मेलेले फार उत्तम आहे. हिंदीमध्ये एक वाक्य आहे, "जीवन के आमोद प्रमोद के सामने कुछ लोग किसी की जान की पर्वा नहीं करते !"

आपण शिक्षण घेत असताना फक्त डिग्री मिळविणे हे एकच ध्येय आपले नाही. त्याचबरोबर समाज कार्य, समाजातील वाईट प्रथा नष्ट करणे हे आपले ध्येय मानलं पाहिजे. या शिक्षणाचा काय उपयोग आहे? "'जुने जाऊ द्या मरणालागुनि,'' असे ध्येय ठेवले पाहिजे.

देशाच्या प्रगतीबरोबर बहुजन समाज पुढे आणून त्याची सुद्धा प्रगती करावी व केली पाहिजे. हे आजच्या तरुणाचे कर्तव्य आहे. त्याच वेळी म. फुले, महात्मा गांधी कर्मवीर वि. रा. शिंदे असे नेते स्वर्गातून हे पाहतील व ते तेथे आनंदाने बेहोष होऊन जातील. आम्ही सुरु केलेल्या कार्याची सिद्धी झाल्याचे त्यांना वाटेल. त्यांचं मन संतुष्ट होईल नाही तर ते श्वास घेऊन आजच्या समाजाला शाप देतील.

## :-: सद्य सभ्य नकार :-:

एखाद्याने आपल्याजवळ येऊन कसलीशी मागणी वा कुठलीशी विनवणी करावी व आपणास काही कारणाने तीस नकार द्यावा लागावा, असा प्रसंग अनेकांच्या अनुभवाचा असेल. अशावेळी सभ्यता न सोडता आपला नकार कसा दर्शवावा ते एका कवीने पुढील-प्रमाणे सांगितले आहे--

१) कोणाच्याही म्हणण्यास सभ्यपणे नकार दर्शविण्यासाठी पहिला व उत्तम मार्ग म्हणजे मौन.

२) तेवढ्याने प्रकरण आटोपत नसल्यास नेमके उत्तर देण्यास शक्य तेवढा विलंब करणे.

३) त्या पुढची पायरी म्हणजे त्या ठिकाणाहून निघून जाणे

४) तरीहि पिच्छा पुरविला गेल्यास, जमिनीकडेच पाहात राहाणे.

५) नंतर मात्र भुवया चढविणे आणि--

६) शेवटी इतक्या खटाटोपानंतरही ज्यास आपला अभिप्राय आकलन होत नाही त्याची कींव करून व त्याच्याकडं पूर्ण दुर्लक्ष करून दुसऱ्याच विषयाबद्दल बोलू लागणे.

संग्राहक—बी. आर लांडे
द्वितीय वर्ष साहित्य

# य स्टी

**बि. मा. सुरंगे**
तृतीय वर्ष साहित्य

"आईकल्यासा काय...." हिन आतनं हाक दिली.

"काय म्हटलीस !" मी पटक्याचा शेव खवीत म्हटलं आनि तंबाकूची पुडी खिशात ठेवली.

'भाकरी भाजलीया, बिगीधान खावा की, आज आईतवार....म्हाईत हाय काय न्हाई.'

"म्हाईत आसनां काय व्हतंय" म्हणत जागचा हाललो. गाडगीबी जाळीत बांधली व्हती. डेरा एक आनि घागर ही घेणार व्हत्ती.

मी जेवाय बसलो. हिला म्हटलं, 'आज लक्सू कुटं आला न्हाई?' तशी तव्यात धापकून भाकरी टाकत 'अस्सल कुटंतरी' म्हणाली आनि शेवटची भाकरी बडवायला लागली. येकच पोरगं सातवीपतोर कसं तरी शिकवीस आनलं. फुढं शिक म्हनूनशान कावलो. पन काटं छादिष्ट ! न्हाईतर ह्या चारपाच वर्सात बी. ई. करायचं मत व्हतं. मग आम्नातरी दुकान चालवीत आपल्या पोराला किती सिकीवतोय बगीतलं आसत. लक्सू आसल कुटंतरी दारूच्या दुकानात बाटल्या उचलीत, न्हाईतर ऊस खाईत आंघूळीला गेला आसल. त्येचबी डोस्क हालकं पन साळंवर ध्यानच दिना मी. बी जा, जा म्हनून सांगून कावलो तर ते उलटं त्वांड सोडायचं 'गाडगीबी बडीव म्हंतास, पासबी व्हो म्हंतास, आम्नाच्याबी दुकानात न्हातोस काय म्हंतोस' काय येक ! तेचं बी खरंच हाय. येळला पेनसूल हाय तर पुस्कत न्हाई. तर कदी आंगभर धडूतं न्हाई. माजी बी लई बिच्छा व्हती फुडं सिकवायचं म्हनून. त्येचा आता बोलून काय उपेग ?

गपागपा जेवलो. गुळी टाकायला भाईर आलो. म्हंगाव गाडी दारावरनं गेली वाईच गडबड केली. धोतार घेतलं. पायतानाचा बाद उसला व्हता. त्येला बाकाच्या बटीनं कसा तरी गुंडाळला. हिला म्हटलं, "आईकलीस काय ?" आटीप लवकर भाकरी मोड आनि ये बिगीद्यान"

"पायात पायतान घाला काटाबी भाईर याला न्हाई." भाकरीचा तुकडा मोडता मोडता ही म्हणाली. तसं पटका सरळ करीत मी म्हटलं.

"ते बगूया घे"

"बगूया ! बगूया !! काय बगायचं ? कवा झालं तर हेच ह्या बापयाचं. पावलाला सूज चडलीया तर बी बगायचंच म्हनं !" ही खेसाकली. मगशान

हाळू म्हणाली, "जाळीत जरा कमी गाडगी बांदा."

त्यायला तिचबी बरूबर हाय तो येकाद्या वक्ताला बाड बाड बोलली पन बाकी पटन्याजोगं हां काय."

हिला 'तू तवरका ये' म्हनून मी भाईर पडलो.

थोडी यस्टीचीसडक कातरली. मग जरा आडवाटला आलो पुन्ना सडकला आलो. तवर यंक यस्टी आली, धुळ्ळा काय सांगून उपेग न्हाई पटक्यात डोस्कं घामानं डबडबलं व्हतं. तोंडावरबी घाम मावना झालाता. कपाळावरनं आनि गालावरनं घामाचं वरंगाळं पडत व्हत तवर धुळ्ळचान गाटलं पावडर थापल्यावानी धुळ्ळा तोंडावर बसला समोरली सडक दिसेना गटाराकडनं सडकवर चालू लागलो तवर येका दगडाला आंदळा झाल्याला पाय दणकून ठंचाळला गाडग्याची जाळी जीवाच्या करारावर सांबाळली जीवाला कळ सोडना. डोळ्चास्नी अंदारी आल्यागत झालं कासराभर कसंतरी चललो. मग वाईच बरं वाटलं खरं पाय दुकावला त्येंची कळ फुड चालू दिना. शपतीन तरी बाजार नकोसा झाला. हिंग्लजचा बाजार, मानसांची दांडगी वर्दळ. अगदी दमून बाजारात आलो. तवर पाटोपाट ही बी आली खरं 'हे' तीला बोललो न्हाई. न्हाईतर तिचं त्वांड सुटलं आसतं. आनि तिला वाईटबी वाटलं आसतं.

बाजार भीगीच भरला, वनवा लागल्या सारका, गाडगी फुका पासरीनं मागाय लागली. जळनाचं तरी पैसं निगत्यात काय न्हाई झालं ही आसती या म्हनून बरं, आक्का, दादा मामा करून गाडगी, लाटी, मांगं, पदरात घालतीया.

मला आडोळाची सवय म्हनूनशान हिनं एक भाकरी आनलीती ती मागच्या बाजूला व्हवून चावली.

बाजाराचा दिस कवा गेला कळलंच न्हाई वझं थोडकंच बांदलंत. दिस उतरतीला लागला अकीरचा

डेरा वळकोवर कुनाला तरी दिला. फुडच्या आईतवारी तरी हातात पैसं व्हतील.

इकरी झालीती. हिनं चुंबळीन त्वांड पुसलं आनि हुश्श ऽ ऽ करीत खाली बसली. येका येकीच हिची नदार माझ्या पायाकडं गेली तसी काकुळतीला येऊन म्हणाली, "किती पाय सुजवून घेतल्यासा?"

माज्याबी पायातनं आता कळ याला लागली होती. याद काडली म्हनूनशानच काय देवाला ठावं पाऊलबी सकाळच्यापरास सुजलाता.

बारक्या पिसवीतली रोजच्यागत येक आदेली हिनं माझ्या हातात ठेवली. आनकीन येक दित ती बोलली. "मी बाजार करून गावाकडं यीन. तुमी आज चालत जाऊ नकोसा मोटारीनं जावा पाऊल बेडकीवानी सुजलाया. थारा तरी कसा व्हतोय तुमाला?"

जाळी घेतली आनि मी हाललो. ही बाजारात गेली.

ही दर आईतवारी म्हनायची मोटारीनं जावा. आमचा बा मोटारीत बसला न्हाई तरी ल्योक तरी कुटचा बसतोय? दोन तीन टायमाला यस्टीनं जायाची खटपट केलो. यस्टीला बाजाराच्या मानसांची थप्पडच्या थप्पड! वाट बगून बगून जेवनवक्ताला घरान जायाची पाळी आलती. म्हनून त्येचा इचार कवाच केला न्हाई आनि गावाकडनं याचं म्हणजे बाजाराची गाडगी कुटं न्हायाची? वझ्याशिवाय जलमभर काय व्हायलं न्हाई येक गाडाव व्हतं तेबी असंच गेलं लगीन झाल्यापास्नं गाडवाचं नाव न्हाई. त्येचा एक दारात खुट्टा तेवडा हाय नावाला.

इस्टँडवर आलो मानसं कुटलीबी येवढी पिकल्यात देवाला ठावं. सर्व्या बाजाराची मानसं इथं आल्यालो. मला काय वाटना यस्टी गावल म्हनून. तवर एक यस्टी कुटनंतरी आली तिकडं मानसं पळाली ज्यादा गाडी सोडलीया' कुनीतरी म्हटलं आमच्या गांवचा

दुकानदार आन्ना तिथं व्हता तो गाडीत चडायला लागला मी मनाला म्हटलं, हिथं हुभारून कायबी व्हयाचं न्हाई गाडी कुनीकडनंबी जाऊ देत.

गरदीतनं मी कसं तरी चडलो. आनि बारीजवळ बसलो. आन्ना समोरल्या बाकड्यावर बसलाता.

आन्ना लई वाईट मानूस. सिफेद कपडं वापरायचा पन काय उपेग न्हाई. घानीतली पै सुदा जीभनं उचलून घियाला कमी करायचा न्हाई. भारी जिगट ! मी बारका तंबाकू एकदम घ्यायचा म्हनून ईस पैसाचा घेतला तर दोन दिसानं आठ आणं म्हनून सांगू लागला. माजं आयकूनच घिना. आपलंच खरं करायला लागला. मी मनाला ताळा केला. येवढ्या पैशानं काय मी मरणार न्हाई.

म्हंता म्हंता यस्टीचं इंजिन सुरु झालं तरी गाडी गचागच्च भरलीती. कायतरी नवीनच वाटायला लागलं. कदी न्हाई ते आज यस्टीत बसलो तो बसाय गादी कापसागत मऊ, काचाबी डेऱ्याच्या तळागत जाडच्या जाड. यस्टीचा पतरा तर आडघाच्या खापरीवानी ! आन्नानं इच्चारलं, "काय गोपाळा आज येस्टीतनं बरं ?"...

धुळ्ळा उडवीत यस्टी फर्लांगावर आली. कंडेक्टरानं घंटी मारली गाडी हुभारली तेवा इचारलं, "गाडीत तिकीट कोन घ्यायचंय का ?" मी हळूच आन्नाला इचारलं, 'आन्ना तुमाला तिकीट मिळालं काय ?" तर आन्ना बोलला, "सगळ्याना अगोदरच तिकीट दिल्यात" "मग माजंबी येक घ्या की" म्हनत मी हिनं दिल्याली आदेली आन्नापुढं केली.

"... आन्नानं कंडक्टरला सांगितलं कंडेक्टर चिडला भकल्यावानी कायच्या बाईच ब लाय लागला. म्हनाला, "म्हातान्या शानपण हाय काय न्हाई उतर खाली." जागती काय बोलून घ्यायच्या आगुदर पाय सांगाळीत खाली उतरलो. त्येच्या तोंडाला खंड नव्हता. खाली हुभारतो. तर त्येनं दुसऱ्यासनी तिकीटं दिली. मला काय ठावं या सव्र्यानी तिकीट फाडल्यात म्हनून.

पोरगं बरोबरीला आलं पन गावात अजून कुनाकडनं 'गोप्या तू आसा हाईस म्हनून घ्यायला न्हवतं. खरं ह्यांच्याकडनं शानपन ईचारून घेटलं त्येनतरी शानपन कुटं व्हतं. मनाला काईच्या बाईच व्हयाला लागलं. दिस पाक बुडलाता.

मी हिच्या बाईच आगुदर घरात टेकलो लक्ष्मू गाडगी बडवीत व्हता. बसलो खरं सडकनंच आलोय असं वाटाय लागलं. सडक आटपला झाली पायाला कळा सोसनात काय न्हाई न्हाई ते ईचार मनात याला लागलं आमचा लक्ष्मू कंडेक्टर व्हता आमना तर त्येनं यस्टीतच तिकीट दिलं आमनं. लक्ष्मूकडं बगितलं आनि लईच वाईट वाटलं. मनात म्हटलं "त्या कंडेक्टरला बी आसला परसंग ईल कवातरी". आनि शिगवर दिवा ठेवला.

पाय ठणकत व्हता तसंच डोस्कंबी. जीव नक्कोसा झालात. हिनं जेवतानं मिनत्या मिनत्या केल्या कायबाय बोलाय लागली दोन घास कसंतरी पोटात घातलं आनि हाललो.

घोंगडं घेतलं आनि दारातल्या वसरीत लवंडलो. काळोक झालाता दारातनंच यस्टी जायाची. लागनच इस्टँड व्हतं. तितलं झाड भुतागत वाटत व्हतं. आबाळात चांदन्या हिशेब न्हाई. तेवढ्या हन्या पापन्याची उघडझाप चालली ती येक बारी कमी कमी व्हातेली

• घरातनं येकदम नवा सिफेद डिरेस घालून भाईर आलो गाडवाच्या सदऱ्याजवळ यस्टी हुबी व्हती. अगदी नवी कोरा ! लक्ष्मून आनि त्येच्या मैतरानी यस्टीच्या टपावर गाडग्याच्या, घागरीच्या आनि डेऱ्यांच्या जाळ्या ठेवल्या व्हत्या, त्या गच्च बांदून लक्ष्मू मागच्या शिडीवरनं उतारला. येका बुकात काय तरी लिवून घेतलं. मी हिला म्हटलं, "आयकू आलं काय? वकोत व्हईल', तर पदर सावरीत ही म्हणाली, "यस्टी आमचीच हाय. घाई कशाला,

दुकानदार आन्ना तितं व्हता तो गाडीत चडायला लागला मी मनाला म्हटलं, हितं हुभारून कायबी व्हयाचं न्हाई गाडी कुनीकडनंबी जाऊ देत.

गरदीतनं मी कसं तरी चडलो. आनि बारीजवळ बसलो. आन्ना समोरल्या बाकडयावर बसलाता.

आन्ना लई वाईट मानूस. सिफेद कपडं वापरायचा पन काय उपेग न्हाई. घानीतली पैं मुदा जीभनं उचलून घियाला कमी करायचा न्हाई. भारी जिगट ! मी वारका तंबाकू एकदम घ्यायचा म्हनून ईस पैसाचा घेतला तर दोन दिसानं आठ आणं म्हनून सांगू लागला. माजं आयकूनच घिना. आपलंच खरं करायला लागला. मी मनाला ताळा केला. येवढया पैशानं काय मी मरणार न्हाई.

म्हंता म्हंता यस्टीचं इंजिन सुरु झालं तरी गाडी गचांगच्च भरलीती. कायतरी नवीनच वाटायला लागलं. कदी न्हाई ते आज यस्टीत बसलो तो बसाय गादी कापसागत मऊ, काचावी डेऱ्याच्या तळागत जाडच्या जाड. यस्टीचा पतरा तर आडचाच्या खापरीवानी ! आन्नानं इच्चारलं, "काय गोपाळा आज येस्टीतनं बरं ?"...

धुळ्ळा उडवीत यस्टी फर्लांगावर आली. कंडेक्टरानं घटी मारली गाडी हुभारली तेवा इचारलं, "गाडीत तिकीट कोन घ्यायचंय का ?" मी हळूच आन्नाला इचारलं, 'आन्ना तुमाला तिकीट मिळालं काय ?" तर आन्ना बोलला, "सगळयाना अगोदरच तिकीट दिल्यात." "मग माजंबी येक घ्या की" म्हनत मी हिनं दिल्याली आदेली आन्नापुढं केली.

"...आन्नानं कंडेक्टरला सांगितलं कंडेक्टर चिडला भकल्यावानी कायऱ्या बाईच बलाय लागला. म्हनाला, "म्हाताऱ्या शानपण हाय काय न्हाई उतर खाली." जास्ती काय बोलून घ्यायच्या आगुदर पाय मांगाळीत खाली उतरलो. त्येच्या तोंडाला खंड नव्हता. खाली हुभारतो. तर त्येनं दुसऱ्यास्नी तिकीटं दिली. मला काय ठावं या सर्व्यांनी तिकीट फाडल्यात म्हनून.

पोरगं बरोबरोला आलं पन गावात अजून कुनाकडनं 'गोप्या तू आसा हाईस म्हनून घ्यायला न्हवतं. खरं ह्यांच्याकडनं शानपन ईचारून घेटलं. त्येनतरी शानपन कुटं व्हतं. मनाला काईच्या बाईच व्हयाला लागलं. दिस पाक बुडलाता.

मी हिच्या बाईच आगुदर घरात टेकलो. लक्सू गाडगी बडवीत व्हता. बसलो खरं सडकनंच आलोय असं वाटाय लागलं. मडक आटपला झाली पायाला कळा सोसनात काय न्हाई न्हाई ते ईचार मनात याला लागलं आमचा लक्सू कंडेक्टर व्हला आसता तर त्येनं यस्टीतच तिकीट दिलं आसतं. लक्सूकडं बगितलं आनि लईच वाईट वाटलं. मनात म्हटलं "त्या कंडेक्टरला बी आसला परसंग ईल कधातरी", आनि शिगवर दिवा ठेवला.

पाय ठणकत व्हता तसच डोस्कबी. जीव नक्कोसा झालात. हिनं जेवतानं मिनत्या मिनत्या केल्या, कायबाय बोलाय लागली दोन घास कसंतरी पोटात घातलं आनि हाललो.

घोगंडं घेतलं आनि दारातल्या छपरात लवांडलो. काळोक झालाता दारातनंच यस्टी जायाची. लागूनच इस्टॅंड व्हतं. तितलं झाड भुतागत वाटत व्हतं. आबाळात चांदन्या हिशेब न्हाई तेवडया व्हत्या. पापऱ्यांची उघडझाप चाल्लं ती येकेक चांदनी कमी कमी व्हातेली.

• घरातनं येकदम नवा सिफेद डिरेस घालून भाईर आलो गाडवाच्या खुट्टयाजवळ यस्टी हुबी व्हती. अगदी नवी कोरा ! लक्सूनं आनि त्येच्या मैतरानी यस्टीच्या टपावर गाडग्यांच्या, घागरीच्या आनि डेऱ्यांच्या जाळया ठेवल्या व्हत्या. त्या गच्च बांदून लक्सू मागच्या शिडीवरनं उतारला. येका वकात काय तरी लिवून घेतलं. मी हिला म्हटलं, "आयकू आलं काय? वकोल व्हईल", तर पदर सावरीत ही म्हणाली, "यस्टी आमचीच हाय घाई कशाला,

बाजाराची मानसं जमू देत तरी."

"तू आगुदर गाडीत बस बगू" मी रागानच बोल्लो. मग ती गाडीत सगळ्यांच्या मागं दारापासी बसली. येकयेक मानसं जमायला लागली. येकेकाची वळक सुदा न्हवती. यस्टीसमोर लूत लागल्यालं कुतरं बसलतं. मी हारन वाजवून आवाज सोडला तरी उटना. थोडया येळानं बाजूला झालं.

"किती मानसं जमली ?" मानसाकडनी बगीतच मी हिला इचारलं.

"इस तीस व्हतील की." ही लोकाकडनं तिकीटाचं पैसं घेवून रंद तोंडाच्या गाडग्यात मापून ठेवत म्हणाली.

"हं गाडी दबवा आता" म्हनत ही जाग्यावर बसली.

मिनं समोरची कान्च पुसली आनि यस्टीचं इंजिन चालू केलं. गाडीनं जागा सोडला. धुळचा दणक्यानं उडत व्हता. वाटेवरची झाडे वेगानं माग जात व्हती. तवर आन्ना दुकानदार सडकनं जातेला दिसला. जवळ गेल्यावर हात केला तशी गाडी थांबिवली. "गोपाळा एक सीट घे." काकुळतीला येऊन म्हनाला. "मी फुल्ल हाय म्हनत आवाज काडला. आन्ना एकदोन फर्लांग मागं न्हायला.

यस्टी फुडं आली. तवर शेजारची म्हातारी दिसली. गाडी हुभी केली. "इटूच्या आई बस यस्टीत" तर ती म्हणाली, "गोपाळा माज्याकडं पैसं कमी हाईतरं." मी आवाज चडवून म्हनालो, "तुला पैश्याचं कोन इचारलय ? आईकलीसग इटूच्या आईला दार उगडून आत घे."

....आनि गाडी वेगात सोडत व्हतो .. खालची बाग मागं गेली .. बाजाराकडच्या हिरी आल्या...."

"च्या झालाय उटा" म्हनत हिनं तोंडावरचं घोंगडं काडलं आनि आत गेली. डोळं जड झालंतं. उघडझाप केली आनि गप्पच न्हायलो. जराशानं उटलो मेडीला टेकून बसलो. म्हंगावाकडनं यस्टी येत व्हती आन्ना इस्टँडवर थांबला व्हता. यस्टी हुभारली आन्ना आत चडला आनि घंटी वाजली.

## शेळीची चोळी

पिलांनी दूध पिऊन टाकू नये म्हणून शेळीच्या सडांना पिशवी बांधतात. अशीच एक शेळी छोटया सुजाताने पाहिली. ती म्हणाली, "मावशी, ती बघ शेळीने चोळी घातली आहे"

## नळ पाणी पिऊन येतो.

माझे आणि माझ्या लहान बहिणीचे जेवण झाल्यावर आम्ही हात धुवायला नळावर गेलो. पण पाणी यायला अवकाश होता. मी संगीताला म्हणाले, "थांब, नळाला पाणी यायला अजून अवकाश आहे."

तेव्हां संगीता म्हणाली, "नळ पण पाणी पिऊन येतो कां ग ?"

कु. प्रतिभा प्र. कुलकर्णी
पदवीपूर्व साहित्य

# .... स्त्री ....

१) स्त्री ही पुरुषाची पडछाया आहे. तिला पकडण्याचा प्रयत्न कराल तर ती दूर पळेल व तिच्यापासून जितके दूर जाण्याचा प्रयत्न कराल तितकी ती अधिक जवळ येईल.

**-ॲम्फर्ट**

२) पत्नी म्हणजे परमेश्वराने दिलेली सर्वात मोठी देणगी होय.

३) प्रत्येक स्त्रीने जर आपल्या पतीला, पुत्राला किंवा भावाला युद्ध भूमीवर जाऊ दिले नाही तर कुठलाही देश युद्धाच्या फंदात पडणार नाही, युद्धे पुढे चालू ठेवू शकणार नाही.

**-श्रीमती रुझवेल्ट**

४) स्त्रीच्या डोळयांत कायद्यापेक्षाही अधिक शक्ती आहे. परंतु खऱ्या अर्थाने विचार करायला गेला तर तिच्या डोळयांतील अश्रूच अधिक प्रभावशाली आहेत.

**-सेव्हिल**

५) स्त्री ही पुरुषाचा खरा पोशाख आहे.

**-कुराणे शरीफ**

६) पुरुषाच्या जखमेवरील गुणकारी मलम म्हणजे स्त्री !

**-लुकमान**

७) घराची खरीखुरी शोभा स्त्री आहे. ज्या घरात स्त्री नाही त्याघरांत सुख व चैतन्य मुळीच नाही.

**-वृदीसे शरीफ**

८) स्त्री हे पुरुषाच्या जीवनातल अतिशय मधूर गीत आहे.

**-कालीदास**

९) स्त्री ही घराची खरी शोभा आहे. ज्या घरात स्त्री नाही त्यांत परमेश्वराचं पाऊल पडणार नाही.

**-हरीसन**

१०) स्त्री ही ईश्वराने आकाशांतून पुरुषाला बक्षिसादाखल दिलेली अत्याकर्षक वस्तू होय.

**-शेक्सपीयर**

**संग्राहक-बी. एस्. भागोडी**
पदवी पूर्व वाणिज्य

# सर्व श्रेष्ठ संत
# श्री ज्ञानेश्वर

**कु. रंजना बेकनाळकर**
द्वितीय वर्ष साहित्य

गुरुश्रेष्ठ जो वंद्य निवृत्तीदास ।
अलंकापुरी नित्य ज्याचा निवास ।
जयाची स्मृति शांतवी हो मनासी ।
नमो श्रीजगन्मान्य ज्ञानेश्वरासी ।

श्रीसंत ज्ञानेश्वरांचा जन्म ११९७ साली युवानाम संवत्सर वद्य अष्टमीस मध्यरात्री विठ्ठलपंत व रुक्मिणी-बाई यांच्या उदरी जन्म झाला ज्ञानेश्वरांचे घराणे यापूर्वी शेकडो वर्षे आपेगाव येथे वस्ती करून राहिले होते. पूर्व वयातच विठ्ठलपंतानी नाथपंथाची दीक्षा घेतली व वेद शास्त्रांचे अध्ययन केले. विवाहानंतरही विठ्ठलपंत पूर्वीप्रमाणे आपला नित्यक्रम करीत राहिले, साहजिकच रुक्मिणीबाईंना याचा विषाद वाटला. आपल्या पित्याला ही गोष्ट सांगताच. सिद्योपंत रुक्मिणी-बाईचे वडिल आपेगावास येवुन दाघाना आळंदीला घेवून गेले, पण विठ्ठलपंताची विरक्ती कमी न होता वाढली काशीस जाण्याची परवानगी पत्नीकडून न मिळाल्याने ते तसेच निघून गेले व स्वतः अविवाहीत आहोत असे रामनंद स्वामीना खोटच सांगून संन्यास दीक्षा घेतली.

थोडयाच दिवसात रामचंद स्वामी स्वतः यात्रा करीत फिरत असता आळंदीस आले. तेव्हा इतर स्त्रिया प्रमाणे रुक्मिणीबाई त्यांच्या दर्शनास गेली असता 'पुत्रवती भव' असा आशिर्वाद दिला. साहजिकच रुक्मिणीबाईना हसू आले. चौकशी अंति रामानंदाना आढळले की ज्याला आपण थोडयाच दिवसापूर्वी संन्यास दीक्षा दिली तोच गृहस्थ या बाईंचा पती. पुढे काशीस जाऊन स्वामिनी विठ्ठलपंताची चांगलीच कान उघडणी केली.

संन्यासानंतर पुन्हा गृहस्थाश्रमात प्रवेश केल्यामुळे आळंदीकर ब्राम्हणांनी त्यांना वाळीत टाकले. अशा परिस्थितीत त्यांना ४ अपत्ये झाली शके ११९५ साली निवृत्तीनाथ ११९७ साली ज्ञानेश्वर व ११९९ साल सोपानदेव व शके १२०१ साली मुक्ताबाई हे कन्यारत्न झाले. सनातनी कर्मठांनी त्याचा हरएक तऱ्हेचा छळ केला परंतु अंतरीची शांती अणुभरही ढळू दिली नाही. मुलांची मुंज करण्याची वये झाली तरी मुंज होईना म्हणून विठ्ठलपंताना खूप दुःख झाले. आळंदीकर ब्राह्मणवृंदाच्या मताने विठ्ठल पंत आणि रुक्मिणीबाईंनी प्रायश्चित भोगण्यासाठी गंगामातेला जीवन समर्पण केले.

अर्थात ही चारी भावंडे बहिष्कृत असून शिवाय अनाथही झाली. त्यांना ना घर ना दार. तथापि यास्थितीत ती परमेश्वराच्या प्रेमाचा आश्रय घेऊन राहिली या अवधितच त्यांनी अध्ययन केले व काही चमत्कार करून दाखवले हे पाहून त्यांना शुद्धीपत्र दिले. पण ते मिळाले तरी या भावंडानी संसारात लक्ष न घालता भक्तिमार्गाने व धर्माचरणाने अखंड प्रवास स्वीकारून काल निर्वाह करण्याचे ठरविले. त्यामुळे अनेक ठिकाणच्या लोकांशी संबंध येऊन अल्पवयातील त्यांची विद्वता व साधुशिलत्व पाहून लोकांना मोठे कौतुक वाटले. त्यांची किर्ती होऊ लागली.

याप्रमाणे परिभ्रमण करीत असता ही भावंडे प्रवरा तीरावरील नेवासे या गावी येऊन राहिली याच कालावधीत महाराष्ट्री यांची हृदये काबीज करणारी ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव हे दोन अद्वितीय ग्रंथ वयाच्या १२ ते १५ वर्षात लिहिले एका टोकाला कौटुंबिक दुर्दशा ! व दुसऱ्या टोकाला हे मान्यता वैभव. जगात ज्याचा छळ अधिक त्याला बळ अधिक 'Blood of the Martyr is the seed of the church. असे म्हणावे लागेल ज्ञानेश्वरांना जनतेला परमार्थ सांगण्याची इच्छा झाली तेव्हा त्यांनी गद्य टाकून पद्याचा स्वीकार केला व मूळ गीतेवरील ७०० श्लोकावर ९ हजार ओव्या सर्वसामान्याना समजव्या इतक्या सोप्या व रसाळ भाषेत पद्यमय लिहिल्या स्वतःच्या ग्रंथ कर्तृत्वाच्या गुणाची ज्ञानेश्वरांना पूर्ण जाणीव व आत्मविश्वास होता. या जाणिवेचा अनेक ठिकाणी त्यांनी उच्चारही केला आहे.

'तैसे शब्दाचे व्यापकपण । देखिजे असाधारण
पाहातया भावज्ञा फावती गुण चिंतामणीचे ।।

स्वतः ज्ञानेश्वर ज्ञानवादी असले तरी भक्तीमार्गी होते. ज्ञानावर अधिष्ठित झालेली भक्ति म्हणून त्यांच्या भक्तिला ज्ञानोत्तर भक्ति म्हणतात. ज्ञानेश्वरांचा आत्मविश्वास अतिशय होता. महाराष्ट्री यांची मने काबीज करण्याचा जणू त्यांनी विडाच उचलला, ते म्हणत.

' माझा मराठाचि बोल कौतुके । परि अमृता
तेही पैजा जिंके ।
ऐसी अक्षरें रसिकें । मेळवीन ।।

